
स. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं. ८३४
१५४३





REFBK-0007953

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन

# शीखांचे
# गुरु

लेखक
**रघुनाथ लक्ष्मण उपासनी**
प्रमुखाध्यापक, गव्हर्नमेंट हायस्कूल, कामटी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८९५३

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

REFBK-0007953

मूल्य चौदा आणे

# प्रस्तावना

सभोवतीं असंख्य पर्वतावलि, अनेक विस्तृत पवित्र महानद्या, शूरांचें व धार्मिकांचें वसतिस्थान, धनधान्यसमृद्धि, प्राचीन महामुनींच्या तपश्चर्येनें पावन केलेलीं असंख्य पवित्र तीर्थक्षेत्रें व ह्या सर्वांवर पांखर घालणारी जी सृष्टिमाता तिचें अलौकिक सौंदर्य, इत्यादि अनेक गुणांनीं सुविख्यात असा पंजाब प्रांत आर्यावर्ताच्या उत्तरेस आहे. सिंधु, गंगा, यमुना, सतलज व चिनाब ह्या पंच महानद्यांनीं आपल्या पवित्र जीवनानें हा सारा प्रदेश सुसंपन्न करून तेथील जनतेस खरें जीवन प्राप्त करून दिलें आहे, म्हणून ह्या भूमीस पंजाब हें यथायोग्य नांव मिळालें आहे.

अति शीत असा उत्तरध्रुवाकडील प्रदेश सोडून उबाऱ्याची जागा शोधीत जे अनेक आर्य इकडे आले, ते प्रथम ह्याच देशांत शिरले. येथील अनार्यांस जिंकून गंगा-यमुनेच्या खोऱ्यांत ते वस्ती करून राहिले. हळुहळू त्यांनीं नगरें वसविलीं. अनार्यांना खालीं दक्षिणेंत जावें लागलें. संपन्न भरतभूमींतून त्यांनीं धान्य व खनिज संपत्ति काढून तिला कुबेर-नगरीचें रूप दिलें. परकीयांशीं व्यापार आरंभिला. रक्षणार्थ सैन्यव्यवस्था केली. क्षत्रियांनीं देशरक्षणाचें कार्य अंगीकारल्यानें ब्राह्मणांनीं अलौकिक ग्रंथसंपत्ति निर्मिली. आजच्या आर्यावर्तातील सर्व धर्मसंप्रदायांचें बीज ह्याच वेळीं पेरलें गेलें. नीतिशास्त्र, राज्यशासनशास्त्र, वगैरे विषयांवर जसे ग्रंथ रचले गेले, तसेच लौकिक विषयांवरून अलौकिक तत्त्वशोधनांकडे आर्यांनीं आपली बुद्धि वळवून आत्मस्वरूप व मोक्षस्वरूपाची ओळख करून देणारे ग्रंथही निर्माण केले. हेच ग्रंथ सांप्रतचे दर्शनउपनिषदादि ग्रंथ होत. सामान्य जनांना ईश्वरप्राप्तीकरितां उपासनामार्ग लावून दिला व त्यासाठीं पवित्र तीर्थांच्या ठिकाणीं देवालयांची स्थापना केली.

अशा रीतीनें आर्य आर्यावर्तांत सुखानें काळ घालवीत असतां अनेक वर्षांनंतर अरबस्थान, इराण ह्या देशांत महंमदी धर्म वाढत होता. ह्या धर्माचा धर्मसंस्थापक पैगंबर महंमद ह्याच्यानंतर त्याच्या अनुयायांनीं त्या धर्माचा प्रसार जोरांत सुरू केला. उत्तर आर्यावर्तांत अनेक बलाढ्य क्षत्रिय राजे राज्य करीत व त्यांचा ह्या लोकांशीं घोडे व मोतीं ह्यांचा व्यापारही चालत असे. त्यांच्या राज्याच्या सीमा पंजाबपर्यंत आल्याही होत्या. ह्या वेळीं पंजाबांत जयपाळ नांवाचा एक बलाढ्य राजा राज्य करीत होता. ह्याच वेळीं अनेकदा मुसलमानी टोळ्यांचीं आक्रमणें पंजाबवर झालीं. त्यांना आर्यांनीं तोंडही दिलें, पण आक्रमकांच्या लुटारू स्वभावामुळें व

९५७३५
२८।११।५३



नासधूस करण्याऱ्या वृत्तीमुळें आर्यांचा फारसा टिकाव लागला नाहीं. सबक्तगीन व व त्यानंतर महंमद ह्यांच्या स्वाऱ्यांचा आर्यावर्तावर फारच भयंकर परिणाम झाला व यावनी सत्तेचीं बीजें रुजलीं गेलीं. महंमदानें आपल्या राज्यास पंजाब जोडला व धर्म आणि राज्य वाढवीत त्यानें दिल्ली गांठली.

क्षत्रियांनीं तेथून राजस्थान गांठलें व नंतर नर्मदा ओलांडून दक्षिणेंत येऊन ते राज्य करूं लागले. पुढें सुमारें १३०० सालीं अल्लाउद्दीन खिलजीनें दक्षिणेकडे आपली नजर वळविली व देवगिरीचें राज्य नष्ट केलें. उत्तर व दक्षिण आर्यावर्त दिल्ली ते रामेश्वरपर्यंत पूर्ण यावनी सत्तेच्या आहारीं पडलें. ह्यापुढें सुमारें २०० वर्षें आर्यांचा यावनी सत्तेकडून अतोनात छळ झाला, नाना तऱ्हेचे डोईजड कर लादले गेले, मंदिरें उध्वस्त झालीं, गोहत्या सर्रास सुरू झाली, मूर्ति भंगल्या गेल्या, तीर्थें भ्रष्ट झालीं. दक्षिणेपेक्षां उत्तरेंत त्यांचे फारच हाल होऊं लागले. यावनी धर्मप्रसाराला प्रतिकारक अशा ब्राह्मणांचा उच्छेद होऊं लागला व इतर अज्ञानी जनांना बलात्कारानें यावनी धर्माची दीक्षा देण्यांत येऊं लागली. आर्यसनातन धर्म ऱ्हास पावूं लागला. विशेषतः उत्तरेंत यवनांच्या सहवासानें व बलत्कारानें आर्यांचा आचारविचार, पोषाख वगैरेंत बाह्यतः यावनी धर्माची छटा दिसूं लागली व आर्यधर्म समूळ नष्ट झाल्यासारखा दिसूं लागला. आर्यधर्म नष्ट होऊं नये म्हणून रामानंद, गोरखनाथ, कबीर ह्यांनीं अनेक प्रयत्न केले. दक्षिणेंतील साधुसंतांनीं ह्या कामीं केलेली कामगिरी प्रसिद्धच आहे. अशा ह्या धर्मग्लानीच्या वेळीं उत्तरेंत — पंजाबांत — एका महापुरुषाचा अवतार झाला तोच आद्य शीखगुरु नानक होय. त्यानें नवीन धर्मप्रणाली सुरू केली व यावनी धर्मांच्या हल्ल्यांतून सनातनधर्माचें शीख धर्म स्थापून रक्षण केलें.

आद्य शीख गुरु नानक व त्याच्यानंतरचे नऊ गुरु ह्यांचीं संक्षिप्त चरित्रें विद्यार्थ्यांसाठीं ह्या पुस्तकांत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक चरित्राच्या शेवटीं अभ्यासासाठीं प्रश्न दिले आहेत त्यांचा उपयोग व्हावा.

र. ल. उपासनी

कामटी, विजयादशमी १८७५

१५५३
७८

# अनुक्रमणिका

१. आद्य शीख गुरु नानक ५
२. गुरु अंगद १४
३. गुरु अमरदास २०
४. गुरु रामदास २७
५. गुरु अर्जुन ३४
६. गुरु हरगोविंद ४५
७. गुरु हरराय ५३
८. गुरु हरकिसन ५८
९. गुरु तेघबहादुर ६३
१०. गुरु गोविंदसिंह ७४

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

पहिली आवृत्ति : १९५३

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

५६३४

# १. आद्य शीख गुरु नानक

७८५३

पंधराव्या शतकांतील गोष्ट. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानी अंमल होता. दिल्लीला लोदी घराणें राज्य करीत होतें. माळवा गुजराथ येथेंही मुसलमानी सत्ता होती. तापी व कृष्णा ह्या नद्यांमधील मुलुखांत बहामनी राज्य होतें. खानदेश, संयुक्त प्रांत हे अफगाणांच्या ताब्यांत होते. विजयनगर व राजपुताना ह्यांखेरीज सर्व हिंदुस्थानवर यावनी सत्ता होती. हिंदुस्थानची सत्ता मिळविण्यासाठीं अनेक मुसलमान घराणीं परस्परांत लढलीं व दिल्लीस रक्तपात करून नामशेष झालीं. पंजाब हिंदुस्थानचें प्रवेशद्वार आणि सुपीक व सधन प्रांत. त्याला शांतता लाभणें अशक्यच. पंजाब म्हणजे हिंदु व मुसलमान ह्या दोन भिन्न संस्कृतींच्या लोकांच्या वसतीचा प्रांत. ह्यांचें आपसांत जमणार कसें? ह्या दोन जातींना एकाच देशांत आयुष्य कंठणें व सुरळीत व्यवहार करणें अशक्य होत असे. त्या वेळीं परस्परांत सहकाराची अत्यंत आवश्यकता भासे. हें घडवून आणण्याचें कार्य रामानंद-कबीर ह्यांसारख्या सत्पुरुषांनीं बरेंच केलें. "आपण सर्वजण एकाच परमेश्वराचीं लेकरें आहोंत. पापाचा नाश रूढी पाळून होत नसून हार्दिक प्रार्थना व पवित्र आचरण ह्यांनींच होत असतो" असा उपदेश ह्या साधुसंतांनीं त्या वेळीं जनतेस दिला.

****************************************

ह्याच तत्त्वाचा व्यवहारांत उपयोग करून तत्त्वज्ञान व व्यवहार ह्यांची ज्यानें सांगड घालून दिली आणि फक्त एकाच व्यक्तीची उन्नति न करतां अखिल हिंदु राष्ट्राची ज्यानें उन्नति केली, तोच सत्पुरुष शीखांचा आद्य गुरु बाबा नानक हा होय. नानकाचा जन्म लाहोर जिल्ह्यांत तळवंडी—ह्यालाच सांप्रत नानकाना म्हणतात—येथें इ. स. १४६९ त झाला. तो आईबापांचा एकुलता एक म्हणून फार लाडका होता. आईचें नांव तृप्ता—त्रिपताका—व पित्याचें नांव काळू होतें. काळू हा खत्री असून 'वेदी' शाखेचा होता. त्याच्या घराण्याला वेदी हें नांव कां पडलें ह्यासंबंधीं एक कथा आहे ती अशी :

श्रीरामचंद्राचे दोन मुलगे लहु व कुश ह्यांनीं पंजाबांत लाहोर व कुशावती येथें राज्यें स्थापिलीं होतीं. पुढें त्यांच्या पुत्रांत कलह माजले. लहूच्या वंशजानें कुशाच्या वंशजाचा पराभव केला. पुढें तो कुशावतीश्वर काशीस जाऊन वेदाध्ययन करूं लागला. तेव्हांपासून सर्व लोक त्याला 'वेदी' ह्या नांवानें संबोधूं लागले. ह्याच वेदी शाखेंतील काळू होता. प्रभु रामचंद्राच्या सूर्यवंशांत जन्मलेला काळू वेदी सरकारी पटवाऱ्याची नोकरी करीत असे, पण परमात्मसेवेंत सदा निमग्न असे. त्याची पत्नी साध्वी त्रिपताका रामचिंतनांत काळ घालवी. बरींच वर्षें पुत्र नसल्यानें ती फार दु:खी असे. हिच्या पोटीं नानक जन्मास आला. लहानपणींच नानकाच्या शिक्षणास आरंभ होऊन त्यानें बालपणांतच हिंदी व पर्शियन भाषा अवगत करून घेतल्या होत्या. त्यानें वेद व कुराण ह्यांचेंही अध्ययन केलें होतें. त्याची बुद्धि अतिशय तीव्र होती. त्याच्या प्रश्नांनीं त्याचे गुरुजीही निरुत्तर होत असत. नानक बालपणापासून सात्त्विक व धार्मिक वृत्तीचा होता. त्याचा बहुतेक काळ साधुसंत व फकीर ह्यांच्या सहवासांत जाई. ह्या विरक्तवृत्तीमुळें नानकाच्या भावी आयुष्याची त्याच्या आईबापांना फार काळजी वाटत असे. त्याचें व्यवहारांत लक्ष लागावें म्हणून काळूनें त्यास एकदा २० रुपये देऊन व्यापारधंदा करण्यासाठीं परगांवीं पाठविलें.

************************************************

आज्ञाधारक नानक घरून निघाला. रस्त्यांत त्याला कांहीं फकीर भेटले. त्यांच्याशीं परमेश्वरासंबंधीं चर्चा करण्यांत स्वारी रंगली. ते धर्मनिष्ठ फकीर चार दिवसांपासून उपाशी आहेत हें कळतांच नानकानें जवळचें भांडवल फकिरांना वांटून दिलें. कारण ‘ भूतांची दया हें भांडवल संतां । आपुल्या ममता नाहीं देहीं ॥ ’

काळूला हें कळतांच तो संतापला. त्यानें नानकाला चांगलीच शिक्षा केली. नानकाची ही विरागी वृत्ति पाहून त्याच्या आईला फार वाईट वाटे. एकदा तिनें त्याला उपदेश केला. ती म्हणाली, “ मानवाचें प्रधान कर्म भगवत्कृपासंपादन होय आणि ती कृपा विरक्तीवांचून मिळूंही शकत नाहीं. परंतु संसारतापानें होरपळलेल्या जीवाला ती जशी प्राप्त होते तशी इतरांना प्राप्त होत नाहीं. संसारत्याग हा परमेश्वरप्राप्तीचा खरा मार्ग नाहीं. चित्तवृत्ति संसारांत विजयी झाली पाहिजे. वैराग्यप्राप्तीला गृहस्थाश्रमच योग्य आहे. कारण इतर कोणत्याही आश्रमापेक्षां गृहस्थाश्रमांत दुःखवेदना अधिक असतात. चित्तवृत्ति दमन करण्याचे प्रसंग अधिक येतात. म्हणून परमेश्वरकृपाप्राप्तीसाठीं गृहस्थाश्रम स्वीकार आणि आपल्या आयुष्याचें सार्थक करून घे. ” नानकानें मातेच्या बोधामृताचा स्वीकार केला. रात्रभर त्यानें विचार केला व त्याला तो उपदेश पूर्ण पटला.

नानकाचें लवकरच लग्न झालें व संसाराची बेडी त्याच्या पायांत अडकली. त्याच्या पत्नीचें नांव सुलक्षणा. लग्नानंतर सुलतानपूर येथें सरकारी धान्यकोठीवर काळूनें त्यास नोकरीस लावून दिलें. त्यानेंही नोकरी चांगल्या रीतीनें केली. पुढें त्याला श्रीचंद व लक्ष्मीदास असे दोन पुत्र झाले. मुलगा संसाराला लागलेला पाहून बापाला संतोष वाटला. नानकाचें मन मात्र संसारांत न लागतां परमेश्वरचिंतनांतच गुंग असे. कडक व्रतानें आयुष्य घालवून आपल्या गरजा भागविण्यापुरतेच अगदीं थोडे पैसे जवळ ठेवून बाकी तो दीनदुबळ्यांस वांटून देई. अधिकारीवर्गाकडून होत असलेला लोकांचा छळ पाहून त्याचें मन खिन्न होई. यवन धर्माची दीक्षा देण्यासाठीं

*****************************************
होणारी सक्ति व हिंदूंची हत्या पाहून त्याचें हृदय तुटत असे. ह्या अन्यायाचा प्रतिकार करणें शक्य आहे काय ह्याचा तो सतत विचार करी. असें अन्यायी जीवन जगण्यापेक्षां धर्मोद्धारार्थ जीवन व्यतीत करावें असें त्यानें ठरविलें.

रानांत जाऊन तो परमेश्वरचिंतन करूं लागला. एकदा तो असाच ध्यानस्थ असतांना एक दिव्य पुरुष त्यास दिसला व लगेच अदृश्य झाला. त्या पुरुषाचें पुन्हा दर्शन व्हावें म्हणून नानकानें तीन दिवसपर्यंत तपश्चर्या केली. शेवटीं नानकास त्या दिव्य पुरुषाचें पुन्हा दर्शन घडलें व त्यानें त्यास उपदेशही केला. तो योगी म्हणाला, " वत्सा नानका, आज ह्या भारतवर्षांत ऐहिक सुखाभिलाषी यवनांचें राज्य पसरत आहे. आर्य क्षत्रिय निस्तेज होऊन कीटकासारखे पारतंत्र्यांत जीवन कंठीत आहेत. ब्राह्मण सद्यःस्थिति न जाणतां रूढीला चिकटून वागत आहेत. सनातनधर्म नष्ट होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. तरी आतां स्वधर्माचीं मूलतत्त्वें घेऊन आचारधर्मांत थोडाफार परिस्थित्यनुरूप फरक करून सनातनधर्माचें उज्जीवन करणें अवश्य आहे आणि हें कार्य करण्यास तूंच एक समर्थ आहेस. " हा उपदेश ऐकून तो शहरांत परत आला व लोकांस उपदेश करूं लागला कीं जगांत हिंदु व मुसलमान असे धार्मिक भेद नसून आपण सर्व एकाच परमेश्वराचीं लेकरें आहोंत. परमेश्वर निराकार असून तो प्रेमस्वरूप व सत्स्वरूप आहे. शुद्धान्तःकरणपूर्वक भक्ति केली असतां तो प्राप्त होतो.

नानकानें नोकरी सोडली. आपली चीजवस्त गरिबांस वांटून दिली. पत्नीस मुलांचा संभाळ करण्यास सांगून तो पुन्हा अरण्यांत गेला. परमेश्वराचें भजन व चिंतन ह्यांतच त्याचा काळ जाऊं लागला. त्याचा एक विश्वासू नोकर मर्दान हा गायनवादनांत प्रवीण होता. सांज-सकाळ आपल्या मालकाच्या भजनाला तो वादनाची साथ करी. नानकाच्या

**********************************************
दिव्य वाणींतून भजनाच्या रूपानें निघालेलीं मुक्ताफळें म्हणजेच शीखांचा पूज्य धर्मग्रंथ ‘ ग्रंथसाहेब ’ हा होय. —न ६३४

नानकाची ही फकिरी वृत्ति पाहून काळू व त्याचे इतर नातलग ह्यांना अत्यंत वाईट वाटलें. त्याचें मन वळविण्यासाठीं जमीन-जुमला, घर-दार, गुरें-ढोरें, पैसा-अडका, वगैरे अनेक आमिषें त्यांनीं दाखविलीं पण व्यर्थ. प्राचीन ऋषि व स्मृतिकार ह्यांनीं आखून दिलेल्या मार्गानें जाणें ह्या यावनीकालांत अशक्य म्हणून धर्माचारांत कांहीं बदल करणें अवश्यच आहे असें जाणून, देश व लोकपरिस्थितीचें ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं तो तीर्थयात्रेच्या मिषानें देशपर्यटणास निघाला. आपल्या मताचा व भक्तिमार्गाचा प्रसार करीत नानकानें सर्व हिंदुस्थान व पश्चिमेस मक्का-मदिनापर्यंत प्रवास केला व शिष्यसंप्रदाय वाढविला.

मक्केस असतांना नानक एकदा मशिदीकडे पाय करून निजलेला तेथील मुसलमानांस आढळला. ते त्याजवर रागावले. नानक हसून म्हणाला, “ मी परमेश्वराला तुच्छ लेखीत नाहीं, पण आपण मला अशी एखादी दिशा दाखवाल काय, कीं जिकडे परमेश्वर नाहीं ? म्हणजे मी तिकडे पाय करून निजत जाईन. ” नानकाच्या ह्या प्रश्नानें तेथील धर्मगुरु चकित झाले.

प्रवासांत असतांना नानकास बाबराच्या सैन्यानें पकडलें. त्याला बाबरापुढें उभें करण्यांत आलें. नानकाच्या मताचा व वक्तृत्वाचा बाबराच्या मनावर इतका परिणाम झाला कीं त्यानें ताबडतोब नानकास सोडून दिलें; इतकेंच नव्हे, तर सर्वांनीं त्यास योग्य आदर दाखवावा असा हुकूम सोडला. इराण, अफगाणिस्थान, वगैरे देशांत प्रवास करून नानक स्वदेशीं परतला. आर्य, अनार्य हे भेद मानवनिर्मित असल्यानें परमेश्वराला दोघेही सारखेच प्रिय आहेत. ह्या भेदानेंच परस्परांत द्वेष माजला व तोच सनातनधर्मनाशास कारण झाला असें त्याचें मत होतें. ह्या द्वेषाचें मूळ जें



“ ...आपण मला अशी एखादी दिशा दाखवाल काय, कीं जिकडे परमेश्वर नाहीं ? ”

कर्माचार त्याचा तो निषेध करूं लागला. ह्यावद्दल अशी एक कथा सांगतात कीं एकदा कोणी एक ब्राह्मण नदीतीरीं पितृतर्पण करीत होता. नानकानें त्याला विचारलें, “ हें तूं काय करीत आहेस ? ” “ स्वर्गस्थ पितरांच्या तृप्तीसाठीं तर्पण. ” तो म्हणाला. नानकानेंही नदीचें पाणी आणून कांठावर ओतण्यास सुरुवात केली. ब्राह्मण म्हणाला, “ आपण हें काय करीत आहांत ? ” “ चार कोसांवर असलेल्या माझ्या झाडांना हें पाणी देत आहें. ” नानकानें उत्तर दिलें. “ महाराज, हें कसं शक्य आहे ? ” “ कां नसावं ? अनंत अंतरावर असणाऱ्या तुझ्या पितरांना जर तुझं तर्पण पोचतं तर चार कोसांवरच्या माझ्या झाडांना हें पाणी कां पोचूं नये ? ” नानकानें प्रश्न केला. ह्यावरून नानक नास्तिक होता असें नव्हे, तर ज्ञान व भक्ति ह्यांवांचून केवळ यंत्राप्रमाणें केलेलीं कर्में सफळ होत नाहींत हें त्याला सांगावयाचें होतें.

राम-रहीम हीं एकाच देवाचीं नांवें आहेत. परमेश्वर हिंदु-मुसलमान ह्या दोघांनाही प्राप्य आहे. असा उपदेश उपनिषदें व कुराण ह्यांतील उदाहरणें देऊन तो करीत असे. सनातनी, तसेच महंमदी धर्माचे अनेक शिष्य त्याच्या भोवतीं गोळा झाले. मूर्तींत परमेश्वर मानल्यानें त्याचें व्यापकत्व कमी होतें, ह्या महंमदी प्रश्नाला नानकानें फारच चांगलें उत्तर दिलें. मशीद जरी मूर्तीपेक्षां विस्तृत असली तरी विश्वापेक्षां ती लहानच आहे. म्हणून तीर्थ, मूर्ति किंवा उपासनामंदिर ह्या ठिकाणींच फक्त परमात्मा राहात नसून तो सर्व प्राणिमात्रांत आहे व तो सदाचरणानेंच प्राप्त होतो हेंच तें उत्तर. त्याला अनेक शिष्य मिळाले. त्यांना उत्तरेंत पाठवून त्यानें आपल्या धर्माचा प्रसार केला.

अन्यायी मार्गानें गरीब जनतेला पिळून अमूप संपत्ति मिळविली असल्यानें आपण निपुत्रिक आहोंत व परमेश्वर आपणास घोर नरकांत पाठवील ह्या विचारानें एक धनाढ्य गुरु नानकाकडे आपली संपत्ति अर्पण करण्यास आला. भाविक शिष्यांना उन्ह-पावसापासून निवारा मिळण्यासाठीं

************************************************

एक घर बांधून देण्यास नानकानें त्याला सांगितलें. व्यापाऱ्यानें आपल्या संपत्तीचा त्या कामीं सदुपयोग केला. त्या ठिकाणीं वसती होऊन त्याचें नांव कर्तृपूर अथवा कर्तारपूर पडलें. शीखसमाज अजून ह्या पवित्र स्थळीं जाऊन यात्रा करतात. नानकानें आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस कर्तारपूर येथेंच आपल्या कुटुंबीयांत घालविले. दररोजचा प्रार्थनेचा क्रम त्यानें कधींही बंद पाडला नाहीं.

सृष्टिकर्ता हाच नानकाचा एकमेव परमेश्वर होता व त्यास तो ‘सत्य’ ह्या नांवानें संबोधी. अंधश्रद्धा व रूढी ह्यांना फाटा देऊन सत्य, नीति व पावित्र्य ह्या त्रयीवर त्यानें आपला धर्म स्थापन केला. बाह्य आचार-विचार व विधि ह्यांपेक्षां इंद्रियदमन, अन्तःकरणपूर्वक परमेश्वरभक्ति व सदाचार हाच मोक्षाचा सुलभतर मार्ग आहे असें त्याचें मत होतें. गुरूची आज्ञा सदाचरणानें पाळणें हाच शिष्यधर्म अथवा शीखधर्म होय. शीखांत बंधुत्व उत्पन्न करून त्या भावनेला ‘खालसा’ हें नांव त्यानें दिलें. खालसासंबंधीं पूज्य बुद्धि बाळगणारा स्वतःला शीख म्हणजे शिष्य म्हणवतो. शीख धर्माची दीक्षा देतांना प्रत्येकाकडून ‘वा गुरुजी का खालसा’ म्हणजे ‘गुरूच्या खालसाचा जयजयकार असो’ असा मंत्र म्हणवून घेतला जातो. नानकानें लिहिलेला ग्रंथसाहेब अखिल शीख आपला धर्मग्रंथ मानतात. गुरु नानक व पुढील गुरु ह्यांचीं रसाळ कवनें व भजनें आदि ग्रंथसाहेबांत आहेत. ह्यांतील सुरुवातीच्या भागाला ‘जपजी’ म्हणतात. बहुतेक शीख हा भाग मुखोद्गत करून दररोज भूपाळीसारखा म्हणतात. ग्रंथाची मूळप्रत अमृतसर येथील सुवर्णमंदिरांत ठेवली असून तीच वाचून तेथें दैनिक प्रार्थना केली जाते. ह्या ग्रंथासंबंधीं शीखांना इतका आदर व पूज्यभाव वाटतो कीं त्या ग्रंथाची प्रत शीख सैन्याच्या अग्रभागीं ठेवण्याची अजूनही चाल आहे.

“परमेश्वर एक असून तो हिंदु किंवा मुसलमान ह्यांचा नसून प्रत्येक मानवाचा आहे. मानवप्राण्यावर एका परमेश्वराशिवाय कोणीच सत्ता चालवूं

१५१३५
२८।११।५७



*****************************************************

शकत नाहीं. परमेश्वरासंबंधीं ज्ञान हेंच खरें ज्ञान होय आणि तें संपादन करणें हा प्रत्येक मानवाचा हक्क आहे व तो बजावणें त्याचें आद्य कर्तव्य आहे. त्यासाठीं इतर साधनांची जरूरी नसून फक्त अंतःकरणाच्या ठिकाणीं भक्तीचा ओलावा मात्र पाहिजे." हा नानकाचा जीवनमंत्र होता व तोच त्यानें जनतेला दिला. गुरु नानक इ. स. १५३९ मध्यें वयाच्या ७० व्या वर्षीं मरण पावला. अनेक देवता, अनेक धर्मग्रंथ, ह्यांमुळें विस्कळित झालेल्या हिंदु समाजाला त्यानें एक देव व एक धर्मग्रंथ हीं तत्त्वें देऊन संघटित केलें.

[ १ ] नानकाच्या घराण्याला वेदी हें नांव कसें पडलें? [ २ ] नानकाची विरक्ति पाहून त्याच्या आईनें त्याला काय उपदेश केला? [ ३ ] परमेश्वर आणि धर्म ह्यांसंबंधीं नानकाचे विचार सांगा. [ ४ ] १५ व्या शतकांत गुरु नानकानें केलेल्या कामगिरीचें वैशिष्ट्य सांगा. [ ५ ] नानकाच्या प्रवासांत घडलेला एखादा वादविवाद सांगा.

# २. गुरु अंगद

गुरु नानक जिवंत असतांना त्यांना आपल्या मागें आपल्या धर्माचें निशाण फडकत ठेवणारा योग्य माणूस कसा मिळेल ही मोठीच काळजी होती. ह्या कामीं स्वतःचीं मुलें योग्य नाहींत, हें ते जाणून होते. शिवाय मुलाला गुरुपद देऊन आपल्याच घरांत वंशपरंपरा गुरूचा अधिकार चालू ठेवावा ह्या मताच्या ते विरुद्ध होते. त्यांना बरेच शिष्य होते. त्यांपैकीं पट्ट शिष्य मर्दान हा कधींच मरण पावला होता. सर्व शिष्यांत लहानू नांवाचा एक शिष्य त्यांना गुरुपदासाठीं योग्य दिसला. उत्तरेंत मुक्तेश्वर शहराजवळील मट्टीकीसराय ह्या खेड्यांत ह्याचा जन्म झाला. ह्याचा बांप फेरुमल्ल हा एक धार्मिक क्षत्रिय होता. त्याच्या आईचें नांव शुभराई. लहानू बालपणापासून शांत स्वभावाचा सदाचारी मुलगा होता. त्याची वृत्ति नेहमीं परमेश्वरभक्तीकडे असे. योग्य कालीं आईबापांनीं त्याचें लग्न करून दिलें. मातापितरांच्या आज्ञेप्रमाणें त्यानें संसार केला. त्याला दोन मुलें झालीं. पण पुढें त्याचें चित्त संसारांत रमेना. आतां मानवदेहाचें कांहींतरी सार्थक करावें म्हणून घरदार सोडून तो गुरु नानकांकडे गेला. गुरु नानकांची उपदेशामृत-मयवाणी ऐकून लहानूनें नानकांपुढें साष्टांग नमस्कार घातला व आपला देह गुरुचरणीं अर्पण केला.



" ह्या कपड्याखालीं झाकलेला पदार्थ खाऊन टाका. "

***************************************

गुरु नानक मोठे दूरदर्शी होते. शिष्याला गुरुपद देण्यापूर्वी त्यांनीं त्याची अनेक वेळां परीक्षा घेतली. गुरु नानक शिष्यगणासह एकदा अरण्यांतून प्रवास करीत असतां शिष्य भुकेनें व्याकुळ झाले. रस्त्यांत अन्नपाणी कोठें मिळेना. इतक्यांत रस्त्याच्या बाजूला पडलेलें एक वस्त्राच्छादित प्रेत त्यांना दिसलें. गुरु नानक शिष्यांस म्हणाले, "ह्या कपड्याखालीं झाकलेला पदार्थ खाऊन टाका." हें ऐकून शिष्य चपापले. प्रेत खाण्याचा प्रसंग येतोसा पाहून शिष्यांनीं नाकांना पदर लावले व माघार घेतली.

लहानूची गुरु नानकांवर पूर्ण श्रद्धा होती. तो पुढें सरसावला व प्रेताजवळ जाऊन त्यानें त्यावरील कपडा काढला, तों तेथें सुग्रास अन्नाचा ढीग आढळला. लहानूची आपल्यावरील अढळ श्रद्धा पाहून नानकांनीं लहानूस प्रेमानें कवटाळलें. समर्थांना जसा कल्याण, तसा नानकांना लहानू शिष्य मिळाला. आपल्यामागें आपलें कार्य चालविण्यास हाच शिष्य योग्य आहे असें पाहून नानकांनीं त्याचें नांव 'अंगी-खुद' म्हणजे 'स्वशरीर' असें ठेविलें. लोक त्याला पुढें 'अंगद' म्हणूं लागले. "अंगदाच्या शरीरांत मीच स्वतः वास करीन" असें गुरु नानकांनीं सांगितलें होतें.

सर्व शिष्यवृंदाला बोलावून त्यांनीं उपदेश केला, "आपलं कार्य नुकतंच सुरू झालेलं आहे. त्याच्या रक्षणार्थ मीं अंगदाची योजना केलेली आहे. ह्यापुढें त्याची आज्ञा तीच माझी आज्ञा समजावी. सर्वांनीं एकमतानें कार्य करावं. तुमचं सर्वांचं जोंपर्यंत ऐक्य आहे तोंपर्यंत कुणीही तुमचा प्रतिकार करूं शकणार नाहीं. अंगदा ! हें गुरुपद स्वसुखाकरितां नसून सनातन धर्माच्या उद्धाराकरितां आहे, हें ध्यानांत असूं दे. लोकसंग्रह कर व जनतेच्या कल्याणाची काळजी घे. द्रव्यलोभ करूं नकोस. स्वतःच्या निःस्पृह व परोपकारी वृत्तीनें जनतेचा विश्वास संपादन कर. जीवनाच्या अपयशाचं कारण अविश्वासांत आहे, हें ध्यानांत असूं दे. परमेश्वर तुझा मार्ग निष्कंटक करील."

************************************************

सद्वर्तन, भूतदया व गुरूवरील अढळ निष्ठा हे अंगदाचे सद्गुण पाहून नानक त्यावर खूष असत. इ. स. १५३९ त अंगद शीख गुरुपदावर बसला. त्याला नानकांचें कार्य पुढें चालवावयाचें होतें. जनतेंत प्रसृत झालेले नानाविध संस्कार, समारंभाचें बडेजावी धोरण, अंधश्रद्धा व रूढी, वगैरे सर्व प्रकार नष्ट करून गुरु नानकांनीं लोकांवर आपली छाप चांगलीच बसविली होती. आपली साधी राहाणी व उच्च विचारसरणी ह्यांच्या योगानें अखिल हिंदूंचें सामाजिक व धार्मिक जीवन उच्च दर्जाला आणण्याचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून गुरु अंगदानेंही आपल्या कार्याला आरंभ केला व त्यासाठीं उपाययोजनाही सुरू केली.

धर्मप्रसाराकरितां संतचरित्रांची आवश्यकता असते हें जाणून तीं सामान्य जनतेला सुलभ करून देण्यासाठीं त्यानें प्रयत्न केले. अशीं चरित्रें संस्कृत भाषेंत होतीं. पण उत्तरेंत सामान्य हिंदु जनता संस्कृत भाषा सोडून यावनी भाषाच आपली मातृभाषा समजत असे. इतका मुसलमानी सत्तेचा पगडा उत्तरेंत बसला होता. गुरु अंगदानें प्रथम गुरुमुखी नांवाची नवीन लिपीच प्रचारांत आणली. आपला धर्मग्रंथ ह्याच नवीन लिपींत लिहून सामान्य जनतेला वाचण्यास त्यानें तयार करून दिला. संतचरित्रें व इतर बरेंच वाङ्मय ह्याच लिपींत लिहिण्यांत आलें. ह्या लिपीनें शीख व शीखेतर हा भेद स्पष्ट दिसूं लागला. सर्व लोक हा ग्रंथ स्वतः वाचूं लागल्यानें जुन्या धर्माधिकाऱ्यांचें वर्चस्व कमी होऊं लागलें. लोक सुशिक्षित बनले आणि गुरु अंगदाला नानकांचें कार्य करणें अधिक सुकर झालें. गुरु अंगदानें गुरु नानकांचें चरित्र बालसिंधु नांवाच्या नानकांच्या पहिल्या शिष्याकडून ह्या लिपींत लिहविलें. जनतेला अनायासें गुरुचरित्र वाचण्यास मिळालें.

नानकांच्या आठवणींचा संग्रहही त्यानें करविला. ह्या ग्रंथांत गुरु नानकांची आज्ञा आणि शिकवण असल्यानें सर्व शीख ह्याच ग्रंथाचें पठण

करूं लागले. रामायण व महाभारत हे ग्रंथ संस्कृत भाषेंत असल्यानें सामान्य लोकांच्या वाचनांत येत नसत. ह्या नवीन ग्रंथानें ही अडचण दूर केली. रामायण-महाभारतादि ग्रंथांइतकाच वरील ग्रंथ शीखांना पूज्य व आदरणीय वाटूं लागला. विद्येचा प्रसार त्वरित होऊं लागला.

गुरु नानकांचीं तत्त्वें लोकप्रिय करण्यासाठीं व शिष्यगणांतील उत्साह कायम राखण्यासाठीं गुरु अंगदानें लंगर म्हणजे अन्नछत्रें उघडलीं. लोकसंग्रहाचा हा मार्ग गुरु अंगदाला बराच फायदेशीर झाला. त्यामुळें त्याला कार्य करणें अधिक सुलभ झालें. द्रव्य, जमिनी व धान्य ह्या रूपानें लंगरांना देणग्या मिळूं लागल्या. लंगर ही एक दान देण्यास सत्पात्र अशी संस्था अंगदानें निर्माण करून जनतेच्या दातृत्वाचा ओघ सन्मार्गाकडे वळविला. सार्वजनिक कार्याला मदत करण्याचा त्यानें धडाच घालून दिला. अनेकांकडून मदत येऊं लागली. गुरु अंगदाजवळ द्रव्यसंचय होऊं लागला. गुरु अंगद मात्र स्वतःचा निर्वाह दोर विणून करीत असे. गुरूची ही निःस्वार्थी वृत्ति पाहून लोकांची त्याजवर भक्ति जडूं लागली. दान व त्याग हीं धर्माचीं मुख्य अंगें होत हें त्यानें लंगरद्वारा जनतेला शिकविलें. ह्या लंगरांमध्यें सर्व लोक एकत्र बसून जेवीत असत. त्यामुळें शीखांत बंधुभाव अधिकाधिक वाढूं लागला. त्या ठिकाणीं उच्चनीच, रावरंक हा भेदभाव पाळला जात नसे. एका परमेश्वराचींच सर्व लेकरें ह्या भावनेनेंच ते एकत्र जमत असत व परस्परांसंबंधीं प्रेमभाव वाढवीत असत. अशा रीतीनें गुरु अंगदानें दूरवर पसरलेल्या शीखांना एकत्रित केलें. त्यांच्यापुढें वैयक्तिक ध्येय न ठेवतां सार्वजनिक ध्येय ठेवलें. शीखांत ऐक्य उत्पन्न करून अंगदानें शिष्यसंख्या वाढविली.

गुरु अंगद इ. स. १५३९ ते १५५२ पर्यंतच गुरुपदावर होता. तरीही ह्या अल्पकाळांत त्यानें केलेली कामगिरी पुढील गुरूंना फारच उपयोगीं पडली. ह्या वेळीं दिल्लीस हुमायून हा मोगल बादशाहा होता. तो

शांत स्वभावाचा असल्यानें गुरु अंगदाच्या कार्याला त्याजकडून मुळींच व्यत्यय आला नाहीं. गुरु अंगद इ. स. १५५२ मध्यें व्यास ( बिआस ) नदीच्या कांठीं कडूर ह्या गांवीं मरण पावला.

[ १ ] गुरु नानकांनीं अंगदाची गुरुपदावर कशी निवड केली ? [ २ ] गुरु अंगदाला नवीन लिपी कां निर्माण करावी लागली ? त्यापासून काय फायदा झाला ? [ ३ ] लंगराचा गुरु अंगदानें कसा फायदा करून घेतला ? [ ४ ] गुरु नानकांनीं अंगदाला केलेल्या उपदेशाचें तात्पर्य सांगा.

# ३. गुरु अमरदास

अमरदास एका लहानशा खेड्यांत राहाणारा होता. त्याच्या बापाचें नांव तेजोभानू व आईचें नांव सुलक्षणा होतें. गुरु अमरदासाचें राजकुमारी नांवाच्या एका मुलीशीं लग्न झालें होतें. त्यानें संसार केला तरी मनोवृत्ति विरक्तच होती. तो फारसा शिकलेला नव्हता, पण अतिशय श्रद्धाळू होता. त्याच्या भाविकपणाची अशी कथा सांगतात कीं तो एकवीस वेळां हरिद्वारला गंगास्नानाकरितां गेला होता. एकदा तर पत्नी अत्यवस्थ असतांना तिला तशीच टाकून तो निघून गेला होता. हरिद्वारीं असतांना एकदा त्यानें एका वृद्ध यतीला पाणी पाजलें असतां त्या यतीनें त्याचे महदुपकार मानले व तुझा गुरु कोण म्हणून विचारलें. अमरदासानें गुरुच केला नसल्यानें यतीला फार खेद झाला. अशा गुरु न केलेल्या पापी मनुष्याच्या हातचें पाणी प्याल्याबद्दल तो दुःखी झाला. "गुरूविना तुला सद्गति मिळणार नाहीं तरी तूं अवश्य गुरु कर." असें सांगून यति निघून गेला. पुढें अमरदास कित्येक दिवसांनीं घरीं परत आला.

अमरदासाच्या मनाला यतीच्या उपदेशाचा चटका लागला. रात्रंदिवस तो गुरूचें चिंतन करूं लागला. शेवटीं त्यानें उपवास आरंभिला. सात दिवसांच्या उपवासानंतर आठव्या दिवशीं पहाटे त्याला एक भक्तिरसपर

मंजुळ गाणें ऐकू आलें. बाहेर येऊन त्यानें पाहिलें, तों एक बालिका गात असलेली त्याला आढळली. तीं पद्यें कोणीं रचिलीं म्हणून त्यानें तिला विचारलें. ती म्हणाली, “ हीं पद्यें स्वतः गुरु नानकांचीं असून माझे वडील गुरु अंगद ह्यांनीं तीं संग्रहित केलेलीं आहेत. मला तीं माझ्या आईनें शिकविलीं. आम्ही नियमानें दररोज पहाटे तीं म्हणत असतों. ” अमरदास म्हणाला, “ मुली, मला तुझ्या पित्याचं दर्शन घडवशील काय ? ”

मुलीनें अनुमति दिल्यावर तो आपल्या पत्नीची अनुज्ञा घेऊन गुरु अंगदाकडे निघाला. गुरु अंगदाला साष्टांग नमस्कार करून त्यानें विनंती केली कीं “ हे गुरो, मी संसारतप्त अमरदास आपल्या देहाचं सार्थक व्हावं म्हणून आपल्या अनुग्रहाची याचना करीत आहें. तरी ह्या अनाथावर कृपा करावी. ” गुरु अंगदानें त्यास उपदेश केला व तो तेथेंच गुरुसेवा करीत राहिला. गुरु अंगदावर अमरदासाची फार भक्ति होती. तो दररोज प्रातःकाळीं उठून नियमानें गुरूच्या स्नानाकरितां गंगेवरून खांद्यावर घडा भरून पाणी आणीत असे आणि गुरुसेवा मनोभावें करीत असे.

आकाशांत प्रचंड मेघगर्जना होत आंहेत, विजा चमकत आहेत, मुसळधार पाऊस वर्षत आहे, रस्त्यांत वादळानें वृक्ष उन्मळून पडले आहेत, दशदिशा गाढ अंधकारानें धुंद झाल्या आहेत, अशा एका पहाटे, मुखीं हरिनाम घेत थंडीनें कुडकुडत बिचारा अमरदास गुरुस्नानाकरितां गंगातीरावरून पाणी आणीत असतां एका खड्डयांत पडला. पडतांना स्वतःच्या शरीरापेक्षां पाण्याच्या घागरीचीच त्याला विशेष काळजी. तेथें जवळच एक कोष्टी राहात असे. अमरदास पडल्याचा अवाज ऐकून तो कोष्टी कोण पडलें म्हणून आपल्या पत्नीस विचारूं लागला. त्याची स्त्री म्हणाली, “ दुसरा कोण ? असेल तो अमरू ! अशा भयंकर वर्षावांत बाहेर पडणारा त्याच्याशिवाय दुसरा कोण असणार ! ”

अमरदासानें थंडीच्या बचावाकरितां शेकोटी पेटविली. हातापायांतून रक्त वाहात होतें. तो स्वतःच्या शरीराला उद्देशून म्हणाला, “ हे शरीरा,

६८५१३



पडतांना स्वतःच्या शरीरापेक्षां पाण्याच्या घागरीचीच त्याला विशेष काळजी.

आतां तूं दिवसानुदिवस क्षीण होत आहेस. गुरुसेवा करीत जर तूं मला सोडशील तर मी धन्य होईन. अशा ह्या रक्त वाहाण्यानें मला उगाच भीति दाखवूं नकोस. वृथा रक्त कां सांडतोस? शेष रक्ताचा गुरुसेवेकरितां उपयोग होऊं दे!" किती ही गुरुसेवेची तळमळ!

दुसऱ्या दिवशीं गुरु अंगदाचा उपदेश ऐकण्यासाठीं शीखशिष्यांची प्रचंड सभा भरली होती. तेथें तो कोष्टी येऊन गतरात्रींची अमरदासाची हकीकत गुरु अंगदाला निवेदन करूं लागला. अमरूच्या अढळ गुरुभक्तीबद्दल गुरु अंगदाला परम संतोष वाटला. आपल्यामागें गुरु नानकाचें कार्य चालविण्यास हा शिष्य योग्य आहे असें पाहून त्यालाच गुरुपद देण्याचें त्यानें ठरविलें आणि आपली गादी व कार्य त्याच्या स्वाधीन केलें. अशा रीतीनें शिष्य अमरू गुरु अमरदास बनला व त्यानेंही आपल्या गुरूचें कार्य यशस्वी रीतीनें पुढें चालविलें.

गुरु अंगदानंतर शीख गुरुपद अमरदासानें चालविलें. त्या वेळीं इ. स. १५५६ पर्यंत हुमायून व नंतर अकबर बादशाहा दिल्लीला राज्य करीत होता. ह्या राजांकडून गुरूला फारसा विरोध झाला नाहीं. विरोध झाला तो गुरु नानकाचा मुलगा श्रीचंद ह्याजकडून. श्रीचंदानें घरदार सोडून संन्यासवृत्ति स्वीकारलेली होती. त्या वृत्तीला शोभेल असा 'उदासी' नांवाचा पंथ त्यानें निर्माण केला होता. पित्यानें गुरुपद स्वतःच्या मुलाला न देतां अंगदाला दिलें हें पाहून त्याची वृत्ति बदलली व तेव्हांपासून त्यानें संसारत्याग करून हा पंथ काढला होता व जनतेलाही तो संसारत्यागाचा उपदेश करीत असे.

गुरु अंगदानें नानकाचें कार्य जसें उत्तम तऱ्हेनें चालविलें होतें तसेंच तें पुढें चालविण्याचा प्रयत्न अमरदासानेंही केला. परंतु श्रीचंदाचा उदासी पंथ बराच वाढला असल्यानें गुरु नानकाचें धोरण व कार्य पुढें चालविणें अमरदासास कठीण जात असे. श्रीचंदाचा शिष्यपरिवारही वाढत होता. श्रीचंद प्रत्यक्ष नानकाचा मुलगा असल्यानें त्याचा पंथ स्वीकारावा कीं

*******************************************

नानकाचा शिष्य अमरदास ह्याचा पंथ स्वीकारावा हा प्रश्न जनतेपुढें उभा राही.

गुरु नानकानें लग्न करून संसारही केला. संसारत्यागाचा उपदेश त्यानें कधींच केला नाहीं. जग हें नश्वर असून सुखदु:ख हे मनोविकार आहेत, हीच त्याची शिकवण असे. श्रीचंद मात्र त्याच्या अगदीं उलट उपदेश करी. त्याची संसारत्यागाची कल्पना अधिक उच्च वाटत असे. त्यामुळें श्रीचंदाचा उदासी पंथ लोकांच्या मनांत अधिकाधिक भरूं लागला होता. गुरु अमरदासानें प्रपंच करून परमार्थ कसा साधावा व संसारांत राहूनही जीवन्मुक्त कसें व्हावें ह्यासंबंधीं उपदेश करून लोकांवर चांगलीच छाप बसविली होती. प्रपंच करून परमार्थ करणाऱ्या नानकाचें चरित्र लोकांपुढें असल्यानें लोक हळूहळू अमरदासाचेच शिष्य बनूं लागले. श्रीचंद जसा संसारासंबंधीं उदास होता, तसाच स्वत:च्या पंथाच्या कार्याबद्दलही उदासच असल्यानें त्याच्याकडून अमरदासाच्या कार्याला फारसा प्रत्यक्ष विरोध झाला नाहीं. अमरदासानेंही आपल्या लढवय्या शीख समाजांतून उदासी पंथाच्या लोकांना वेगळें केलें. उदासी साधारणत: ब्रह्मचारी, त्यागी, अद्वेषी व तपस्वी असून लंगोटी नेसून राहात. उदासी पंथाच्या ज्या सभा भरत त्यांना ‘ बडा आखाडा ’ असें म्हणत.

गुरु अमरदासानें आपल्या वाढत्या शिष्यवृंदाला बंधनें घालून व्यवस्थित स्वरूप दिलें. शीख सर्व पंजाबभर पसरलेले होते त्यामुळें त्यांच्या शिक्षणाचें व उपदेशाचें कार्य व्हावें तसें होईना. गुरु अमरदासानें सर्व शीख वसाहतींचे बावीस भाग पाडून त्यांवर प्रत्येकीं एक शीखतत्त्व जाणणारा सदाचारी धर्माधिकारी नेमला. ह्या व्यवस्थेनें धर्मप्रसाराचें कार्य झपाट्यानें व निश्चितपणें होऊं लागलें. गुरु अमरदासानें शीखांची एकत्रित सुव्यवस्थितपणें घटना करून पुढील गुरूंकरितां पक्का पाया घालून दिला व पुढील गुरूंनीं त्यावर शीखराष्ट्राची इमारत उठविली.

**********************************************

गुरु नानकानें कर्तारपूर नांवाचें एक खेडें वसवून तेथें शीखांकरितां धर्मशाळा व अन्नछत्र घालून शीख समाजाला एक प्रकारें स्थायिकत्व प्राप्त करून दिलें होतें. अमरदासानेंही हेंच धोरण पुढें चालू ठेवलें. त्यानेंही बिआस नदीच्या कांठीं गोविंदवली नांवाचें एक खेडें वसवून तेथें ८४ पायऱ्यांची एक विहीर बांधली. ह्या विहिरीला क्षेत्राचें महत्त्व येऊन वर्ष-प्रतिपदेच्या दिवशीं यात्रेचें हें एक पवित्र ठिकाण बनलें. ह्या ८४ पायऱ्यांवर प्रात:स्मरणाचीं भजनें म्हटल्यानें ८४ लक्ष योनींच्या जन्ममरणांच्या फेऱ्यांतून मुक्तता होते अशी शीखांची भावना होती. ह्या ठिकाणीं अजूनही वर्षप्रतिपदेप्रमाणें गुरु अमरदासाच्या पुण्यतिथीनिमित्त मेळा करून हजारों गोरगरिबांना अन्नदान करण्यांत येतें.

गुरु अमरदासाच्या कार्यासाठीं हजारों रुपये शिष्यांकडून जमत असत. त्यांचा विनियोग अन्नदानांतच विशेष होई. अमरदासानें सति जाण्याच्या चालीचा निषेध करून बरेंच यश संपादन केलें, त्यामुळें त्याच्या शिष्यपरिवारांत स्त्रियाही येऊं लागल्या व त्याची कीर्ति पसरूं लागली. ही कीर्ति ऐकून मोगल सम्राट् अकबर देखील अमरदासाच्या दारीं येऊन त्यास लागेल ती मदत देत असे. गुरूची निर्लोभी व नि:स्पृही वृत्ति पाहून तो विस्मित होई. गुरु व सम्राट ह्यांची मैत्री कशी जुळून आली ह्याबद्दलची एक मजेदार कथा आहे.

ज्या वेळीं अकबर चितोडवर स्वारी करण्यास निघाला होता त्या वेळीं चितोड मिळविण्याच्या कामीं यश येईलच अशी त्यास आशा नव्हती. कारण राजपुतांचें शौर्य व त्याग हे गुण तो जाणून होता. अकबराचा शुभाशुभ व शकुनापशकुन ह्यांवर इतका विश्वास होता कीं तो कित्येक प्रसंगीं पायीं यात्रा करी व डोकीवर कांहीं घातल्याशिवाय कोणत्याही कार्यास आरंभ करीत नसे.

अकबराच्या सैन्यांत लाहोरच्या अधिकाऱ्याचा एक मुलगा होता. त्यानें चितोडच्या जयाबद्दल अकबरानें गुरु अमरदासाकडे जाऊन कौल लावावा

असें सुचविलें. त्यानंतर लगेच सम्राटानें एक विश्वासू अधिकारी अमरदासाकडे पाठविला. अमरदास त्या वेळीं वरील विहीर खोदण्याच्या कामांत व्यग्र होता. गुरु अमरदासानें शुभाशीर्वाद देऊन अकबराच्या कार्यांत यश चिंतिलें. त्याप्रमाणें खरोखरच घडूनही आलें. चितोड जिंकून परत येतांच अकबरानें गुरु अमरदासाची भेट घेतली. तेव्हांपासून अकबराला शीख गुरूबद्दल आदर व पूज्यभाव वाटूं लागला. पुढेंही कांहीं काळपर्यंत शीख गुरु व दिल्लीपति ह्यांत सख्य नांदूं लागलें. अबकरानें शीखधर्मप्रसाराच्या कामीं विरोध न करतां मदतच केली.

गुरु अमरदास इ. स. १५७४ ह्या वर्षीं मरण पावला. त्याला एक मुलगी व एक मुलगा हीं अपत्यें होतीं. मुलगी त्याची फार सेवा करी त्यामुळें त्याचें तिजवर अत्यंत प्रेम असे. ही तिची सेवा पाहून गुरु अमरदासानें तिच्या व आपल्या पत्नीच्या इच्छेनुसार आपला शिष्य रामदास ह्याशीं तिचें लग्न करून दिलें व त्यासच आपली गादी दिली. ह्यापुढें हें गुरुपद रामदासाच्या वंशांतच चालू राहिलें. गुरु अमरदासानें प्रजेच्या दुःखनिवारणार्थ मोगल सम्राट् अकबर ह्याच्या मदतीनें बरींच कामें केलीं.

[ १ ] अमरदासाला गुरु करण्याची इच्छा कशी झाली ? [ २ ] अमरदासाच्या गुरुभक्तीची एखादी गोष्ट सांगा. [ ३ ] गुरु अमरदासानें केलेली कामगिरी सांगा. [ ४ ] सम्राट् अकबर व गुरु अमरदास ह्यांची मैत्री कशी जडली ?

# ४. गुरु रामदास

एकदा गुरु अमरदास शिष्यगणासह बसले असतां एक बालक त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून हात जोडून उभा राहिला आणि म्हणाला, "गुरुराज! ह्या बालकाचं रक्षण व्हावं अशी प्रार्थना आहे." गुरूनें त्याला जवळ घेतलें व त्याची विचारपूस केली. तो बालक म्हणाला, "मी लाहोरचा राहाणारा. माझ्या वडिलांचं नांव हरिदास सोधी व आईचं नांव दयाकुमारी. माझ्या बालपणीं वडील वारले व तेव्हांपासून माझ्या आईनेंच माझं पालनपोषण केलं. माझ्या कल्याणाची चिंता करीत ती बिचारी पतिदु:ख सहन करीत काळ कंठीत आहे. गुरु नानकांचीं भजनं तिनेंच मला शिकविलीं. ह्या वयांत सज्जनसंगतीचा लाभ व्हावा म्हणून मी आपल्या चरणांशीं आलों आहें, तरी ह्या बालकावर कृपा करावी. माझ्या मातेचीही अशीच इच्छा आहे कीं ह्या वयांत मीं गुरु करावा व आयुष्याचं चीज करावं. आपल्याखेरीज मला योग्य सत्पुरुष कोणी दिसत नाहीं. माझ्या मातेच्या आज्ञेप्रमाणें मी आपणाकडे आलों आहें. ह्या बालकावर कृपा करावी!"

गुरु अमरदास ह्या बालकाचें बोलणें ऐकून संतुष्ट झाले. त्याला त्यांनीं आपल्याजवळ ठेवून घेतलें. रामदास गुरुसेवेंत आपला काळ घालवूं लागला. गुरु अमरदासाला भानुमति नांवाची एक कन्या होती. तिजवर

***************************************

गुरूचें अत्यंत प्रेम होतें. म्हातारपणीं तर ती अमरदासाची काठीच होती. अमरदासाला ह्या कन्येशिवाय कोणीच उत्तम सेवक लाभला नव्हता. एकदा अमरदास चौरंगावर ध्यानस्थ बसले असतां त्या चौरंगाचा एक पाय तुटलेला त्या मुलीला आढळला. तिनें लगेच तो आपल्या हाताच्या आधारानें सावरून धरला. परंतु तिच्या हातांत खिळे घुसून हात मात्र चांगलाच दुखावला. काय झालें म्हणून गुरूनें विचारलें असतां "कांहीं नाहीं" असेंच उत्तर तिनें दिलें. मुलीची शांत वृत्ति व पितृभक्ति पाहून बापाला तिच्या सहनशीलतेचें, परोपकारबुद्धीचें व शांत वृत्तीचें कौतुक वाटलें. "मी तुझ्याकरितां काय करूं ?" असा अमरदासानें तिला प्रश्न केला. ती सच्छील पोर काय उत्तर देणार ? तिच्या आईनेंच तिजकरितां एक इच्छा प्रदर्शित केली. "गुरुसेवेचा वियोग होऊं नये म्हणून ह्यापुढें ह्या मुलीच्याच वंशांत हें गुरुपद चालावं, म्हणजे ती संतुष्ट होईल !" असें तिनें गुरु अमरदासास सांगितलें. "तथास्तु" म्हणून गुरूनें आशीर्वाद दिला व आपला आवडता शिष्य रामदास ह्याच्याशीं भानुमतीचें लग्न लावून दिलें. रामदास गुरूचा जावई झाला तरी त्यानें आपलें शिष्यत्व सोडलें नव्हतें. पत्नीच्या इच्छेनुसार आपलें गुरुपद अमरदासानें त्यासच दिलें. ह्यापुढें रामदासाच्या वंशांतच हें पद कायम राहिलें.

गुरुपदावर बसलेल्या नवीन गुरु रामदासाच्या दर्शनास लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. गुरूपुढें अनेक मूल्यवान् देणग्यांचा वर्षाव होऊं लागला. ह्या वेळीं दिल्लीस मोगल सम्राट् अकबर बादशाहा होता. रामदासाचे भूतदया व दातृत्व हे गुण अकबरानें चांगलेच पारखून घेतले होते. ह्या सद्गुणांमुळें बादशाहाची गुरूवरील भक्ति अधिक दृढ झाली होती. त्याला गुरुदर्शनाची इच्छा झाली व तो एकदा गुरु रामदासाकडे आला आणि मदतीची इच्छा त्यानें प्रदर्शित केली. गुरु रामदासाच्या उच्च ध्येयाकडे पाहून त्याच्या कार्याकरितां लाहोरपासून पूर्वेकडे ५० मैल दूर

१५९३५ २८।१।१५३

*********************************************

अंतरावर सुमारें ५०० बिघे जमीन अकबरानें त्यास दिली होती. त्याच जागेंत एक सुंदरसें तळें होतें. त्या तळ्याच्या कांठीं गुरूनें स्वतःकरितां एक पर्णकुटी व सभोवतीं मंदिर बांधून एक लहानशी वसाहत केली. ह्या जागेला 'रामदासपूर' असें नांव देण्यांत आलें. लवकरच त्या जागेला क्षेत्राचें माहात्म्य प्राप्त झालें. तें तळें उत्तम रीतीनें बांधून काढण्यांत आलें. त्यांतील स्फटिकासारखें स्वच्छ दिसणारें जल शीखांना अमृत वाटूं लागलें. गुरु अमरदासाच्या पश्चात् त्याचें स्मारक म्हणून त्याचें नांव अमरसर (अमृतसर) असें ठेवण्यांत आलें. पूर्वीचें रामदासपूर नांव बदलून सर्व वसाहतीला अमृतसर नांव पडलें. हल्लींचें अमृतसर तें हेंच होय. येथें एक भव्य मंदिर बांधण्यांत आलें त्यास 'गुरुद्वार' म्हणतात.


रामदासपूर अमृतसर बनलें. ह्या अमृतसरचा शीखराष्ट्राच्या उदयाला फारच फायदा झाला. ह्या भागांतील बरेच शेतकरी कामकरी लोक शीखपंथांत भरती होऊं लागले. ह्या लोकांची गुरूवर देवाप्रमाणें अढळ श्रद्धा असे. हेच लोक त्या वेळच्या शीख सैन्याचे प्रमुख असत व हल्लींच्या हिंदी सैन्यांतही तेच प्रमुख समजले जातात. शीखराष्ट्रनिर्मितीला जें पुष्कळसें मनुष्यबल मिळालें तें ह्याच अमृतसरनजीकच्या भूमींतून. अमृतसर हें ठिकाण वायव्यसरहद्दीवरील प्रांत व हिंदुस्थान ह्यांच्या सांध्यावरील नाकें असल्यानें तें दळणवळणाचें केंद्र बनून व्यापारी दृष्टीनें त्याचें महत्त्व विशेष वाढलें. बुखारा, काबूल, काश्मीर, वगैरे ठिकाणांहून हिंदुस्थानांत येणाऱ्या मालावरील जकात घेण्याचें ठिकाण अमृतसरच बनलें व त्या जकातीच्या उत्पन्नावर पुढें महाराजा रणजितसिंगानें शीखराष्ट्राची सांपत्तिक स्थिति सुधारून त्याचा दर्जा वाढविला.

अकबर बादशहाशीं सख्य झाल्यापासून तर गुरु रामदासाचें महत्त्व व त्याच्याबद्दलचा आदर वाढूं लागला. गुरूची निष्काम बुद्धि व त्यागी वृत्ति पाहून अकबराप्रमाणें उच्च दर्जाचे मोठमोठे लोकही त्यास येऊन मिळत व

त्याच्या कार्याला सक्रिय सहानुभूति दाखवीत. अशा रीतीनें उच्च-नीच, सधन-निर्धन, राव-रंक, थोर-लहान सर्व प्रकारचे लोक शीख धर्माच्या पंखांखालीं जमूं लागले. अकबरासारख्या सम्राटाच्या मैत्रीचा फायदा शीखगुरु दीनदुबळ्यांच्या दुःखविमोचनाकडे कसा करून घेई हें पुढील हकिकतीवरून कळून येईल.

एकदा गुरु आपल्या शिष्यगणांसह हरिद्वारच्या यात्रेस जात असतां मोगल अधिकाऱ्यांनीं त्यांना डोईपट्टीकरितां अडविलें. गुरूनें डोईपट्टी देण्याचें नाकारलें. गरीब हिंदु प्रजेवरील हा जाचक कर बंद करण्याचे शीख गुरूंनीं अनेक वेळां प्रयत्न केले होते आणि ज्या ज्या वेळीं असे कर भरण्याचे त्यांना प्रसंग येत, त्या त्या वेळीं ते स्वतः हालअपेष्टा भोगीत पण डोईपट्टीसारखे अन्याय्य कर देत नसत. वरील हकीकत बादशहाला कळली, तेव्हां त्यानें यात्रेकरूंना डोईपट्टी न घेतांच सोडून देण्याचा हुकूम दिला. अशा रीतीनें शीख गुरूनें अकबर बादशहाकडून गरीब जनतेवरील डोईपट्टीचा कर बंद करविला.

एकदा असाच एक प्रसंग घडला. अकबर बादशहाचा आपल्या लव्याजम्यानिशीं लाहोरास तळ होता. बादशहाच्या सैन्याचा आसपासच्या लोकांना त्रास होत असे. जवळच्या गांवांतील धान्य महाग झालें, कारण वाटेल ती किंमत देऊन बादशहाचे लोक धान्य खरेदी करीत. शेतकरी कर्जबाजारी बनूं लागले. दुष्काळांत तेरावा महिना असा कीं भर हंगामाच्या वेळींच अकबरानें लाहोरवर चाल करण्याचें ठरविलें. चाल करून जाण्यापूर्वी अकबरानें अत्यन्त नम्रपणानें शीख गुरूचा निरोप घेतला व " हा दास आपणापुढें हजर आहे, कांहीं सेवा असल्यास सांगावी " म्हणून विनंती केली. ह्या संधीचा गुरूनें जनतेच्या कल्याणासाठीं फायदा घेण्याचें ठरविलें. गुरूनें शेतकऱ्यांची दैन्यावस्था सम्राटापुढें सादर केली. अकबरानेंही त्यांना एक वर्ष सारामाफी देण्याचें गुरूस वचन दिलें व तें बरोबर



हा प्रकार पाहून तो धनिक स्तंभितच झाला !

********************************************
पाळलेंही. शेतकरी सुखी झाले. गुरूचा अकबरासारख्या मोगल सम्राटावर पडलेला प्रभाव पाहून लोक आश्चर्यचकितच झाले. त्यांची गुरूवरील निष्ठा अधिकाधिक दृढ होऊं लागली. अनेक लोक गुरूस येऊन मिळाले. पुढील गुरूंना ह्याच लोकांनीं मनुष्यबळ पुरवून शीखपंथीयांचें शीखसैन्यांत रूपान्तर केलें.

गुरु रामदास अत्यंत निःस्पृह व निर्लोभी होता. गुरु अंगदानें ज्याप्रमाणें अकबरानें दिलेला नजराणा तृणवत् समजून स्वीकारला नाहीं त्याप्रमाणेंच गुरु रामदासाचीही एक कथा आहे, ती अशी: एकदा एका धनवानानें त्याला एक बहुमोल मुक्ताहार अर्पण केला. गुरूनेंही त्याच्या इच्छेनुसार तो आपल्या गळ्यांत घातला. इतक्यांत तेथें एक भिकारी आला. त्याला तोच कंठा गुरूनें दान केला. हा विकून तूं आपलें पोट भर असें त्यास गुरूनें सांगितलें. हा प्रकार पाहून तो धनिक स्तंभितच झाला. गुरु रामदास त्याची खिन्न मुद्रा पाहून म्हणाले, "शिष्या, तूं खिन्न कां ? मला अर्पण केलेल्या कंठ्यावर तुझा लोभ कां असावा ? माझा कंठा ह्या गरिबाला दिलेला पाहून तूं शोक कां करावास ? ज्या वेळीं प्रथमच हे मोतीं सागरांतून बाहेर काढण्यांत आले त्या वेळीं सागर जर दुःखी झाला नाहीं, तर मग तूं कां दुःखी व्हावेंस ? वृक्ष आपलीं फळं-फुलं तुम्हांला देतात किंवा नद्या तुम्हांला पाणी देतात तेव्हां तीं कधीं शोक करीत बसतात काय ? तूं शीख असतांना अशा क्षुद्र विनाशी वस्तूबद्दल मोह कां धरतोस ? स्वतःच्या संसाराबद्दल औदासीन्य पत्करून परदुःखनिवारणार्थ प्रयत्न करणं हेंच तर शीख धर्माचं मुख्य तत्त्व आहे." हा उपदेश ऐकून तो धनिक स्तब्धच राहिला.

गुरु रामदासाचा स्वभाव अगदीं शांत होता. त्याला वाङ्मयाचा फार नाद होता. मागील गुरूंचीं रसाळ, भक्तिपर भजनें संकलित करून त्यानें वाङ्मयांत एक मोठी भर घातली. त्याच्या कारकीर्दींत एक विशेष गोष्ट घडली ती अशी कीं ह्यापुढें गुरुपदावर येणारी शिष्यपरंपरा जाऊन

********************************************

रामदासाच्या सोधी क्षत्रिय वंशाचीच परंपरा सुरू झाली. गुरु रामदास इ. स. १८५१ ह्या वर्षी मृत्यु पावला व नंतर त्याचा मुलगा ' अर्जुन ' ह्यानें आपल्या हातीं गुरुपदाचीं सूत्रें घेतलीं.

[१] रामदास गुरुपदावर कसा आला ती हकीकत सांगा. [२] अमृतसरची स्थापना कशी झाली? हल्लीं ह्या नगराचें काय महत्त्व आहे? [३] गुरु रामदासानें सम्राट् अकबराच्या मैत्रीचा जनतेच्या कल्याणाकरितां कसा उपयोग करून घेतला? [४] गुरु रामदासानंतर शिष्यपरंपरा जाऊन वंशपरंपरा कशी सुरू झाली?

# ५. गुरु अर्जुन

गुरु रामदासानंतर त्याच्या आज्ञेनुसार त्याचा दुसरा मुलगा अर्जुनसिंह ह्याला गुरुपदावर बसविण्यांत आलें. गुरु रामदासाचा वडील मुलगा पृथ्वीचंद्र त्याचा द्वेष करूं लागला. कांहीं शीख त्याला जाऊन मिळाले. परंतु गुरु रामदासाची आज्ञा शिरसावंद्य मानून अर्जुनसिंहालाच पाठिंबा देणारे अनेक शीख होते. त्यांच्या मदतीनें गुरु अर्जुनानें धर्मप्रसाराचें कार्य करण्यास सुरुवात केली. ह्या वेळीं दिल्ली येथें बादशहा अकबरच होता. शेवटीं एक वर्ष जहांगीर हा गादीवर आला होता. गुरु अमरदासानें निरनिराळ्या ठिकाणीं धर्माधिकारी नेमून त्यांचे गट बनविले होते आणि नंतर गुरु रामदासानें धर्मशाळा, अन्नछत्रें, देवालयें बांधून व अमृतसरसारखीं शहरें वसवून शीखधर्माचा पाया मजबूत केला होता. अकबराच्या मैत्रीमुळें शीखधर्म अधिक स्थायी बनला होता. अशा वेळीं शीखांना गुरु अर्जुना-सारखा प्रतिभावान् कवि, व्यवहारकुशल पुरुष, गाढ तत्त्वज्ञानी, उत्तम व्यवस्थापक व राजकारणकुशल मुत्सद्दी गुरु लाभला. ह्यामुळें सहजच नानकाच्या धार्मिक चळवळीला राजकीय चळवळीचें स्वरूप प्राप्त झालें. शीखधर्मकारणाचें शीखराजकारणांत रूपान्तर झालें. राजकारणास लागणारे सर्व गुण गुरु अर्जुनांत होते. अकबर व जहांगीर ह्यांच्या सलोख्याच्या

*************************************************

धोरणामुळें शीखांना परधर्मीयांचा प्रतिकार करण्याचे प्रसंग फारसे न आल्यानें गुरूचें कार्य अधिक सुलभ झालें. अशा अनुकूल परिस्थितीचा फायदा घेऊन व भावी संकटाचें भविष्य जाणून गुरु अर्जुनानें अखिल भारतीय शीखांची सुव्यवस्थित संघटना करण्याच्या उद्देशानें खालील उपाययोजना केली.

प्रथम गुरु अर्जुनानें पवित्र धर्मग्रंथाचें काम हातीं घेतलें. ह्या ग्रंथांत आतांपर्यंत फक्त गुरु नानकाचें चरित्र व त्याचेंच काव्य समाविष्ट केलेलें होतें; पण अर्जुनानें स्वतः अत्यन्त परिश्रम करून इतर साधुसंतांच्या काव्यांची त्यांत भर घातली. जसा हिंदूंना वेद, मुसलमानांना कुराण, ख्रिस्त्यांना बायबल, तसाच शीखांना पूज्य व पवित्र वाटणारा ‘आदिग्रंथ’ त्यानें निर्माण केला. सर्व शीखांच्या धार्मिक भावना आदिग्रंथावर केन्द्रित केल्यानें अनायासेंच शीखांचें संघटन होऊन त्यांच्यांत एक धर्म व एक राष्ट्र ही भावना उत्पन्न झाली.

गुरु रामदासानें वसविलेलें रामदासपूर व तेथील पवित्र अमृतसर सरोवर ह्या स्थळांना अर्जुनानें अधिक महत्त्व आणलें. हिंदूंना परमपवित्र काशी, मुसलमानांना पवित्र मक्का, तद्वतच शीखांकरितांही एक पवित्र क्षेत्र असावें असा गुरु अर्जुनानें विचार केला. गुरु नानक वगैरेंचीं जन्मस्थानें तर तीर्थस्थानें होतींच, पण अखिल शीखांना एकच एक असें पवित्र क्षेत्र त्याला निर्माण करावयाचें होतें. ह्याकरितां त्यानें अमृतसर नगराची योजना केली. त्या सरोवराला अगोदरच पावित्र्य प्राप्त झालें होतें. त्या ठिकाणीं मृताची रक्षा टाकली असतां मृताला सद्गति मिळते अशी शीखांची भावना बनली होती. त्या सरोवराचें पावित्र्य व निसर्गशोभा वृद्धिंगत करण्यासाठीं त्या ठिकाणीं गुरु अर्जुनानें ‘हरमंदिर’ वा ‘सुवर्णमंदिर’ बांधलें. अनेक कुशल शिल्पकारांनीं त्याची उभारणी केली. अमृतसरसारखी निसर्गशोभा व तेथील सुवर्णमंदिरासारखें देवस्थान ह्यांच्या संयोगावर गुरूनें आपला

*****************************************

मठही स्थापन केला व तो स्वतः तेथें येऊन राहिला. निसर्ग, परमेश्वर व भक्त ह्यांचा तेथें त्रिवेणीसंगम झाला. हें स्थान शीखधर्मकार्याचें केन्द्र बनलें. ह्या केंद्राभोवतीं व बारीदुआब ह्या भागांत काबाडकष्ट करून पोट भरणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांत गुरु अर्जुनानें आपल्या तत्त्वाचा व धर्माचा प्रसार करून त्यांना आपल्या गोटांत ओढलें. अशा रीतीनें आजचे शेतकरी उद्यांचे कडवे शूर सैनिक बनले. ह्या मंदिरांत आदिग्रंथाची मूर्ति म्हणून स्थापना केली. ह्यासच ग्रंथसाहेब म्हणतात.

गुरु अमरदासानें शीख वसाहतीचे परगणे पाडून त्यांवर एकेका धर्माधिकाऱ्याची नेमणूक केलेली होती. गुरु रामदासापासून गुरुपदाचा वारसा वंशपरंपरा चालण्याचा प्रघातही पडलेला होता. अमृतसर हें शहर शीखांच्या कार्यांचें केंद्र बनून त्याला क्षेत्रमाहात्म्य प्राप्त झालेलें होतेंच. आदिग्रंथ हा धर्मग्रंथ शीखसमाजाच्या सामाजिक व धार्मिक कायद्याचा एक शासनग्रंथही बनलेला होता. अशा परिस्थितींत सुसंघटित शीख समाजाच्या धर्मगुरूला 'राजा' म्हटलें तरी शोभण्यासारखें होतें. तसें लवकरच घडूनही आलें. शीखधर्मगुरु शीखशास्ता बनला. धर्मगुरूच्या मठाला राजदरबाराचें स्वरूप येऊं लागलें. शीखसमाज जेव्हां गुरूकडे राजा म्हणून बघूं लागला, तेव्हां गुरु अर्जुनानें ह्या संस्थेच्या पोषणासाठीं कर घेण्याची पद्धत सुरू केली. करवसुलीसाठीं प्रत्येक धर्माधिकाऱ्याला एक मदतनीस देण्यांत आला. ठराविक रकमा कराच्या रूपानें जमूं लागल्यानें गुरु अर्जुनाचें वार्षिक अंदाजपत्रकही चांगलें जमूं लागलें. सर्व पटवारी जमलेली कराची रक्कम ठराविक दिवशीं जेव्हां गुरूला अर्पण करीत तेव्हां एक मोठा दरबार भरविण्यांत येई. अशा रीतीनें धार्मिक देणगीला कराचें स्वरूप देऊन अर्जुनानें धर्मांतून राजकारण निर्माण केलें.

गुरु अर्जुनसिंहाच्या प्रयत्नानें शीखधर्म लोकादरास पात्र होऊं लागला. त्यायोगें शीखधर्माचें व पर्यायानें गुरूचें ऐश्वर्य वाढूं लागलें. गुरूचें ऐश्वर्य,

१५१३५
२८।११।५३

*********************************************

लोकादर व कार्यतत्परता पाहून अधिकाधिक लोक शीखधर्मानुयायी बनूं लागले. साहजिकच हें शीखांचें वैभव परधर्मीयांना पाहवलें नाहीं. पृथ्वीचंद्र त्याचा अधिक द्वेष करूं लागला. त्यानें गुरूच्या नाशाचा प्रयत्न आरंभिला. गुरु अर्जुन निपुत्रिक आहे हें पाहून गुरुपद त्याच्या पश्चात् आपल्यालाच मिळेल ह्या आशेवर तो स्तब्ध होता. पुढें गुरूची पत्नी गंगादेवी हिला कांहीं कालानंतर पुत्र झाला. आतां पृथ्वीचंद्राची आशा नष्ट झाली. त्यानें गुरुपदाचा हा भावी वारस नष्ट करण्यासाठीं नीच मार्गाचा अवलंब केला. त्याला विषमिश्रित दूध पाजण्यासाठीं त्यानें एका दासीची योजना केली. परंतु चुकून पृथ्वीचंद्राच्याच पुत्रावर तो प्रयोग झाला व त्याचा हा दुष्ट प्रयत्न फसला. हा प्रकार पाहून त्याला अमृतसरमधून घालवून देण्यांत आलें. बाहेर राहूनही त्यानें गुरूवर मारेकरी घालण्याचे प्रयत्न केले पण ते अखेरपर्यंत यशस्वी झाले नाहींत. गुरु अर्जुनाला परकीयांप्रमाणें हाही एक घरांतील शत्रु त्याच्या कार्यांत अडथळा करी.

घरांतील पृथ्वीचंद्राचा कांटा काढल्यानंतर गुरु अर्जुनानें आपलें लक्ष आपल्या कार्याकडे लाविलें. आपल्या वाढत्या कार्यावर केव्हांतरी आपत्ति येणार हें तो पूर्णपणें जाणून होता. ती आपत्ति निवारण करण्यास त्याच्याजवळ मनुष्यबळ होतेंच; फक्त द्रव्यच त्याला पाहिजे होतें. आतांपर्यंत वैराग्यवृत्तीनें राहून मोक्षप्राप्ति करणें हें जें पूर्वीच्या गुरूचें ध्येय, त्यांत त्यानें बदल केला. परकीयांकडून दुर्बलांना त्रास, सज्जनांचा घात व अबलांवर बलात्कार होत असतांना धर्मरक्षणाच्या कामीं वैराग्यवृत्ति सोडून प्रवृत्तिपर धोरण ठेवणें अवश्य आहे असा त्यानें विचार केला. लौकिक स्वास्थ्या-करितां तरी ह्या वृत्तीची आवश्यकता त्याला वाटली. केवळ वैराग्यवृत्ति ठेवून अन्नाकरितां दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहाण्याचा प्रसंग येऊं नये, म्हणून त्यानें द्रव्यप्राप्तीसाठीं व्यापार सुरू केला व लवकरच आपल्या अमृतसरनगरीला कुबेरनगरीचें स्वरूप प्राप्त करून दिलें.

शीखसमाज स्वसंरक्षणास समर्थ करणें ही गुरु अर्जुनाची सर्वांत श्रेष्ठ कामगिरी होय. शीखांतील साहस, उत्साह, स्वाभिमान, पराक्रम, इत्यादि सद्गुण वाढीस लागावे व शीखसमाज धनसंपन्न व्हावा म्हणून अनेक शीख अनुयायांना तुर्कस्थान व अरबस्थान इकडे घोडेखरेदीला पाठवून व्यापाराचा उपक्रम गुरु अर्जुनानें सुरू केला. ह्या उत्तेजनानें जे अनेक फायदे झाले त्यांत मोठा फायदा असा झाला कीं राजकारणांतील एक धोंड बनलेली, हिंदूंची सिंधूच्या पलीकडील परदेशगमनाच्या पापासंबंधींची भावना ठार मारली गेली. दुसरा फायदा असा झाला कीं मुसलमानी मुलुखांतल्या कडव्या जातीच्या स्वभावाची व सामर्थ्याची ह्या प्रवासानें शीखांना चांगली जाणीव करून दिली. घोड्यांच्या व्यापारांत शीखांना चांगलाच पैसा मिळूं लागला. देणगी किंवा कर ह्यांच्या रकमेंतून हा व्यापार होत असल्यानें सर्व नफा सार्वजनिक तिजोरींत पडूं लागला. घोडेखरेदीच्या धंद्यानें शीख नुसते व्यापारीच बनले नाहींत, तर घोडदौडींतही प्रवीण बनले. घोड्यावर बसणें हा एक राष्ट्रीय खेळ बनला. पुढें लढाया जिंकून शीखांनीं जें अपूर्व यश संपादन केलें त्याचा पाया ह्याच राष्ट्रीय खेळांत होता.

धर्मप्रसार करणाऱ्या शीखसमाजाची गुरु अर्जुनानें राष्ट्रीय संस्था बनविली. त्याबरोबरच त्यानें आपल्या राहाणींतही बदल केला; कारण आतां तो राजा समजला जाई. वंशपरंपरा चालत आलेल्या रूढींना तो चिकटून राहिला नाहीं. जुनें तें सोनें म्हणून त्यानें आपला समाज नामर्द व नामशेष केला नाहीं. कार्य व प्रसंग पाहून आपली राहाणी व धर्म ह्यांत बदल करणें त्यास आवश्यक होतें. गुरु नानकापासून चालत आलेल्या धर्मसभेला त्यानें कायदेमंडळ बनविलें. झोपड्यांच्या जागीं त्यानें भव्य राजवाडे उभे केले; मठाचा दरबार बनविला; जपमाळेच्या ऐवजीं त्यानें हातांत तलवार धारण केली. चौरंगावर बसून धर्मोपदेश करणारा गुरु अर्जुन आतां घोड्यावर बसून राजकारण लढवूं लागला. स्वतःचा

संसार नश्वर मानणारा गुरु राष्ट्राचा संसार थाटूं लागला. राजा ह्या नात्यानें अर्जुनानें इतर सर्व फेरबदल केले पण स्वतःचें जीवन मात्र अत्यंत साधेंच ठेविलें. ह्या बाबतींत तो आपल्या गुरूचा ‘ सच्चा पादशहा ’ च होता.

गुरु अर्जुनाच्या ह्या स्वयंस्थापित व स्वयंशासित संस्थेला मोगल दरबारींही महत्त्व प्राप्त झालें होतें. मोगल बादशहा जहांगीर ह्याचा मुलगा खुस्रु ह्यानें बापाविरुद्ध बंड केलें त्या वेळीं तो पंजाबांत गुरु अर्जुनाच्या आश्रयानें राहात होता. ह्या प्रसंगानें मोगल राजघराण्यांत तंटे सुरू होऊन सर्वांचे डोळे अर्जुनाकडे लागले होते; कारण गुरूकडून मदत मिळण्याचें त्यास वचन मिळालें होतें. अशा रीतीनें गुरु अर्जुन व त्याची संस्था ह्यांना मोगल दरबारांत थोडेंसें तरी महत्त्व प्राप्त झालें. त्यांत दुसरीही एक भर पडली. गुरु अर्जुनाजवळ द्रव्य व सैन्य बरेंच जमलें होतें. सर्व सैन्याचा मुख्य गुरुच असे. हें मुख्यपण — राजेपण — वंशपरंपरा चालणारें होतें.

गुरूची अशी उच्च भूमिका पाहून मोगलांचा लाहोरचा दिवाण चंदुलाल एकदा गुरूच्या भेटीस आला. त्या वेळीं गुरूस जरा शंका आलीच. गुरु व त्याचा पुत्र हरगोविंद दोघेही त्यास भेटले. हरगोविंदाच्या कमरेस दोन तलवारी लटकवलेल्या पाहून चंदुलाल त्या तेजस्वी बालकास म्हणाला, “ वत्सा ! ह्या दोन तलवारी कशाला ? ” बालकानें निर्भयपणें उत्तर दिलें, “ एक शीख धर्मावर आक्रमण करणाऱ्यांच्या निःपाताकरितां व दुसरी स्वतःच्या षड्रिपूंचा नाश करण्याकरितां. ” हरगोविंदाचें हें उत्तर ऐकून चंदुलाल खूष झाला.

दुसऱ्या दिवशीं चंदुलाल आपली कन्या गुरु अर्जुनाच्या मुलास देण्याच्या विचारानें गुरूकडे गेला. धन व अधिकार ह्यांनीं उन्मत्त झालेला चंदुलाल गुरूस म्हणाला, “ माझ्यासारख्या धनाढ्य व राजमान्य पुरुषाची मुलगी आपल्या मुलास देण्याची माझी इच्छा आहे. आपल्यासारख्या निर्धनाच्या मुलास देण्यायोग्य माझी कन्या नाहीं, परंतु माझ्या पत्नीच्या इच्छेकरितां

म्हणून मला आपणाकडे यावं लागलं." गुरूला त्याच्या ह्या उन्मत्त भाषणाचा राग आला. तरी त्यानें शांतपणें त्यास उत्तर दिलें, "मी आपणाकडे मागणी घालण्यास आलों नाहीं. आपण मजकडे आलांत. आम्ही धन व राजमान्यता तृणवत् मानतों. आपण योग्य दिसेल तेथें मुलगी द्यावी. आम्हांला आपली मुलगी कर्तव्य नाहीं."

हें ऐकून चंदुलालचें पित्त खवळलें. आपल्या अधिकाराच्या दडपणानें गुरु आपलें ऐकेल ही त्याची आशा फोल ठरली. गुरु अर्जुनाचा सूड घेण्याचा त्यानें प्रयत्न सुरू केला. दिल्लीस जाऊन त्यानें बादशहाचे कान गुरुद्वेषानें भरविले. गुरु अर्जुन नवीन शीखधर्माचा प्रसार करून महंमदी-धर्माची निंदा करतो व पुढें मागें मुसलमानी राज्य उच्छेदून शीख राज्य स्थापन करण्याच्या उद्देशानें प्रयत्न करीत असतो, असा त्यानें त्यावर आरोप रचला. आदिग्रंथांत महंमदी धर्माची निंदा आहे, असें बादशहास सांगण्यांत आलें. तेव्हां बादशहानें आदिग्रंथ आणण्याचा हुकूम सोडला. हें काम चंदुलालकडेच आलें. भुताच्या हातीं कोलीत मिळालें. तो गुरूकडे जाऊन त्यास म्हणाला, "ह्या राजाज्ञेप्रमाणें आपला धर्मग्रंथ माझ्या हवालीं कर, नाहीं तर माझी कन्या आपल्या मुलास करून घे." गुरु अर्जुन संतापला पण शांतपणें आदिग्रंथ त्याच्या स्वाधीन करून म्हणाला, "दुष्टांच्या हातून जर ह्या ग्रंथ नाश पावणार असेल तर तो आदिग्रंथच नव्हे. गुरु नानकाची वाणी जर तुझ्यासारख्या क्षुद्राकडून नष्ट होणार असेल तर ती गुरुवाणी कसची? अग्नि जर ह्या ग्रंथाला नष्ट करूं शकत नाहीं तर तुझ्यासारख्या पामराची काय कथा! आदिग्रंथ कागदावर नसून तो प्रत्येक शीखाच्या हृदयावर कोरलेला आहे. जोंपर्यंत एकतरी शीख जिवंत आहे तोंपर्यंत आदिग्रंथ जिवंतच आहे. त्यास मरण नाहीं." बादशहानें आदिग्रंथाचें अनेक पंडितांकडून परीक्षण करविलें; परंतु कुराण किंवा मुसलमानी धर्म ह्यासंबंधींची निंदा त्यांत मुळींच आढळली नाहीं. इतकेंच नव्हे, तर अनेक स्थळीं कुराणांतील उदाहरणें त्यांत घेतलेलीं त्यांस

************************************************

आढळली. बादशहानें आदिग्रंथ अत्यंत आदरपूर्वक गुरु अर्जुनाकडे परत पाठविला. चंदुलालचा हा प्रयत्न फसला म्हणून गुरु अर्जुनाला छळण्याचें व राजद्रोही ठरविण्याचें कार्य कांहीं त्यानें थांबविलें नाहीं.

अकबरानंतर सेलिम ऊर्फ जहांगीर हा बादशहा झाला तेव्हां त्याचा पुत्र खुस्रु ह्यानें बापाविरुद्ध बंड केलें. त्यांत त्याचा पराजय होऊन तो गुरु अर्जुनाच्या आश्रयानें राहूं लागला. गुरूनें क्षत्रियाचें कर्तव्य म्हणून शरणागताला आश्रय दिला. एवढेंच कारण पुढें करून चंदुलालनें जहांगीरकडे जाऊन गुरूवर राजद्रोहाचा आरोप लादला.

शीखसत्ता नामशेष करण्यासाठीं मोगलांचे प्रयत्न सुरू झाले. धमक्या, दण्ड, तुरुंगवास, हद्दपारी, छळणूक व अखेर फाशी असे सर्व उपाय मोगलांनीं अमलांत आणले. शीखांनींही ह्या सर्व कृत्यांना धैर्यानें तोंड देऊन स्वधर्माकरितां आपले अमोल प्राण धर्मवेदीवर लटकविण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. शीखसत्तेची वाढ पाहून मोगल बादशहा अगोदरच चिडलेला होता, त्यांत अर्जुनानें खुस्रूला मदत केलेली व दिवाण चंदुलालची मुलगी आपल्या मुलास करून घेण्याच्या बाबतींत दिलेला नकार, ह्या गोष्टींमुळें बादशहा व दिवाण ह्यांचा संताप फारच वाढला. चंदुलालनें अर्जुनास अनेकवार विनंती केली पण ती गुरूनें साफ नाकारली. दिवाणाच्या संतापाचा पारा इतका वाढला कीं तो गुरूचा सूड घेण्याच्या तयारीस लागला. एकदा एके ठिकाणीं नाकारलेली मुलगी दुसरा कोणीं सहसा स्वीकारीत नसे; म्हणून चंदुलाल गुरूस आपली मुलगी स्वीकारण्यास वारंवार विनंती करीत होता. अर्जुनाचे असतील नसतील तेवढे सर्व दोष दाखवून त्याला राजद्रोही ठरविण्याचा तो प्रयत्न करूं लागला. गुरु अर्जुन इस्लामधर्माचा अपमान करून शीखधर्माचा प्रसार करतो हा आरोप त्याच्यावर करण्यांत आला होता पण बादशहानें त्या आरोपास विशेष महत्त्व दिलें नाहीं. अखेरीस राजाविरुद्ध बंड करणाऱ्या खुस्रूस गुरु मदत करतो म्हणून त्यास राजद्रोही ठरविण्याचा त्यानें घाट


**********************************************

घातला. ह्या आरोपाबद्दल गुरूला कांहीं लक्ष रुपये दंड झाला. शीखांनीं रक्कम जमवून दंडाची भरपाई केली, तरी गुरूला तुरुंगवास पत्करावा लागलाच. चंदुलाल ह्यास गुरु अर्जुनाला कैद करून आणण्यास पाठविण्यांत आलें.

आपली सूडबुद्धि फळास आली म्हणून स्वतःस धन्य मानीत चंदुलाल गुरु अर्जुनसिंहास कैद करण्यास सैन्य घेऊन अमृतसर येथें आला. तो गुरूस म्हणाला, "जीव वांचावा अशी इच्छा असेल तर माझ्या कन्येचा अजून स्वीकार कर." गुरु अर्जुनानें हसत उत्तर दिलें, "जेथें तूंच स्वतःचं रक्षण करण्यास असमर्थ आहेस तेथें तूं माझं संरक्षण काय करणार! सिंह पिंजऱ्यांत अडकला तरी गवत खात नाहीं!" गुरु अर्जुन आपण होऊन चंदुलालच्या स्वाधीन झाला. चंदुलालनें गुरूस अटक केल्याची बातमी सगळीकडे पसरतांच अनेक शीख तेथें जमा झाले. शीखेतरांनादेखील अनपराधी गुरूस बंदी केलेला पाहून आश्चर्य व दुःख वाटलें. गुरूनें जातांना जमलेल्या शीखानुयायांस उपदेश केला: "शिष्यांनो, मी मरणाच्या दारीं जात आहें. अश्रु गाळीत तुम्ही स्वस्थ बसून आपलं दौर्बल्य प्रकट करूं नका. स्वधर्माचा प्रसार करा. आदिग्रंथाला पूज्य माना. दुष्टांच्या प्रतिकाराला तोंड देण्यास सामर्थ्य संपादन करा. खड्गधारी बनून धर्माचं रक्षण करा. शापदायी ब्राह्मणापेक्षां खड्गधारी क्षत्रियांनाच दुष्ट अधिक भीत असतात हें लक्षांत घ्या. बाल हरगोविंद ह्याला आपला गुरु मानून आपलं कार्य सतत चालू ठेवा."

गुरु अर्जुनसिंहाला दिल्लींत आणून राजापुढें उभें करण्यांत आलें. अविचारी राजानें त्याला कारागारांत पाठविलें व दुष्ट स्वकुलघातकी चंदुलाल ह्यास तेथें अधिकारी नेमलें. पुन्हा एकदा आपली मुलगी सून म्हणून पत्करण्याची त्यानें विनंती केली पण अर्जुन हा कच्चया गुरूचा चेला नव्हता. त्यानें स्पष्ट नकार दिला. चंदुलालनें गुरु अर्जुनाचे अत्यंत हाल केले. त्याला उकळत्या पाण्यांत बसविण्यांत आलें, वरून तप्त वाळूचा वर्षाव

१५१७५
२८।११।५३



किल्ल्याच्या बाजूनें वाहाणाऱ्या नदींत त्याला किल्ल्यावरून फेकून देण्यांत आलें.

करण्यांत आला, भाजून उरलेल्या शरीराला टाचे मारण्यांत आले व अखेरीस लाहोर किल्ल्याच्या बाजूनें वाहाणाऱ्या नदींत त्याला किल्ल्यावरून फेकून देण्यांत आलें. कोणी म्हणतात, चंदुलालच्या छळास कंटाळून रावी नदीवर स्नानास गेला असतां गुरूनें जलसमाधि घेतली.

चंदुलालसारखा मोगल सम्राटांचा दिवाण गुरु अर्जुनाच्या मुलाला आपली मुलगी देण्यास कां बरें तयार झाला ? ह्यावरून गुरु अर्जुनाचा सामाजिक व राजकीय दर्जा किती उच्च असला पाहिजे ह्याची कल्पना येऊं शकते. कोणत्याही मोहाला बळी न पडतां केवळ स्वधर्माकरितां हाल भोगण्यास व प्राण अर्पण करण्यास तयार झालेल्या गुरु अर्जुनाचें स्वधर्म व स्वकार्य ह्यांसंबंधीं प्रेम किती उच्च कोटीचें होतें व त्यावरील श्रद्धा किती अढळ होती, हें स्पष्ट दिसून येतें. शीखांचें संघटन करून स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचें व त्याचा दर्जा वाढविण्याचें श्रेय जसें गुरु अर्जुनाकडे जातें, तसेंच स्वधर्माकरितां प्राणाहुति देण्याचा आद्यमानही त्याकडेच जातो.

[ १ ] गुरु अर्जुनानें शीखांचे संघटन करण्याच्या दृष्टीनें कोणते उपाय योजले ? [ २ ] ‘ गुरु अर्जुनानें शीख धर्माला शीख राज्याचें स्वरूप दिलें ’ हें म्हणणें कितपत खरें आहे तें सांगा. [ ३ ] शीख इतिहासांत गुरु अर्जुनाचें स्थान ठरवा. [ ४ ] चंदुलाल, पृथ्वीचंद्र व गुरु अर्जुन ह्यांवर टिपणें द्या.

# ६. गुरु हरगोविंद

गुरु अर्जुनानंतर त्याचा मुलगा हरगोविंद गुरुपदावर आला. त्या वेळीं तो ११ वर्षांचा होता. गुरु अर्जुनाचा मृत्यु म्हणजे भावी युद्धाचा पायाच होता. शीखांचा सैन्यांत बराच भरणा होऊं लागला होता. गुरूनें स्वत:च्या पोषाकांत बरीच क्रांति घडवून आणली होती. त्याच्या डोक्यावरील टोपीची जागा राजमुकुटानें घेतली होती. हातांत माळेऐवजीं तलवार आलेली होती. अंगावर कफनीच्या जागीं चिलखत चढलें होतें. आसना-ऐवजीं बसायला घोडा आला होता. ह्याच वेळेपासून गुरु हरगोविंदानें आपल्या गादीला 'तक्त अकाल' म्हणजे 'कालातीत सिंहासन' किंवा परमेश्वराचें आसन, असें नांव देऊन सभेला 'दरबार' म्हणण्यास सुरुवात केली. ह्याच दरबारांत शीखांच्या आपापसांतील तंट्यांचा निकाल होऊं लागला. अनुयायांकडून गुरूकडे जो चंदा किंवा वर्गणी येत असे, तिला 'कर' नांव देऊन ह्यापुढें ती द्रव्यरूपानें न घेतां घोडे, हत्यारें व इतर युद्धसामुग्रीच्या रूपानें घेण्याचा गुरु हरगोविंदानें प्रघात पाडला. ध्यान, तपस्या व प्रार्थना ह्यांतच निमग्न न राहातां गुरु हरगोविंद आपला काल कुस्त्या मारणें, घोड्यावरून रपेट करणें, तंबू ठोकणें, वाघ, अस्वलें, इत्यादि हिंस्र पशूंची शिकार करणें, ह्या मर्दानी खेळांत घालवूं लागला. ध्येय

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

व वेष ह्यांत बदल होतांच शीखांनीं आहारांतही बदल केला. शस्त्रविद्येच्या प्रसाराबरोबर मांसाहार सर्रहा सुरू झाला. भूतदया व विद्वत्ता ह्या गुणांबरोबर शरीरसामर्थ्य व मर्दानी खेळ ह्यांनाही महत्त्व आलें. लक्ष्यवेधाचा अभ्यास करून गुरु उत्तम शब्दवेधी बनला. द्वंद्व युद्धांत तो अनेक मल्लांना चीत करीत असे. गुरूनें पित्याच्या आदेशानुसार स्वतःच्या अंगीं पूर्ण क्षत्रियवृत्ति धारण केली व शिष्यही त्याचेंच अनुकरण करूं लागले. वैराग्यवृत्तीनें उदासीन बनूं पाहाणारे शीख शस्त्रविद्याप्रवीण होऊन युद्धक्रियेंत पारंगत बनले. शीखगुरूचा आश्रम राजप्रासाद बनला.

शिष्यगण सशस्त्र प्रतिकार करण्यास समर्थ झालेले पाहून बापाच्या वधाचा सूड घेण्यासाठीं हरगोविंदानें तयारी चालविली. मोगलशाही नष्ट करून दीन हिंदूंचें रक्षण करण्याचा त्यानें चंग बांधला. कमरेला दोन तलवारी लटकावून एकीनें बापाच्या वधाचा सूड घ्यावयाचा व दुसरीनें मोगलशाही नष्ट करावयाची असा त्यानें निश्चय केला. हिंदु प्रजेचा छळ कमी व्हावा ह्या हेतूनें मोगलशाही नष्ट करण्यासाठीं प्रत्येक शीखानें हत्यारानिशीं तयार असलें पाहिजे असा त्यानें हुकूम सोडला होता. तो हुकूम हीच धर्माज्ञा समजून अनेक शीख जमले व एक जंगी खडें सैन्य तयार झालें. बेकार व भिकार, तसेच लुटारू व डाकू ह्यांचीही सैन्यांत बाजारबुणगें म्हणून भरती झाली. गुरूजवळ ह्या वेळीं ८०० घोडे असून ३०० उमदे घोडेस्वार व ८० तोफा जय्यत सिद्ध होत्या. सैन्याकरितां त्यानें एक किल्लाही बांधला. मुसलमानी राज्यांत न्यायाच्या बाबतींत पक्षपात केला जातो व हिंदूंना योग्य न्याय मिळत नाहीं हें पाहून त्यानें आपलें न्यायालय सुरू केलें. सर्व शीख आपले तंटे गुरूकडून निवडून घेऊं लागले.

गुरु हरगोविंदाच्या गुरुपदाला राजपदाचें येत असलेलें वैभव व सैन्यशस्त्रास्त्रादींनीं वाढलेली त्याची शक्ति पाहून चंदुलालला त्याचें भय वाटूं लागलें. शिवाय गुरु अर्जुनसिंहाच्या मृत्यूला आपणच कारण आहोंत

************************************************

हें त्याचें पापही त्याला जाचत होतेंच. गुरु हरगोविंदाचा पूर्ण नायनाट केल्याविना त्याला चैन पडेना. पृथ्वीचंद्राचेंही चंदुलालनें साहाय्य मिळविलें. ह्या दोघा सर्पांनीं गुरुसंबंधीं अनेक गोष्टी सांगून बादशहाचे कान फुंकले. गुरु हरगोविंद हा महंमदीधर्म व राज्य ह्यांचा नाश करण्याचे गुप्त प्रयत्न करीत असतो, सैन्य वाढवितो, किल्ले बांधतो; वगैरे माहिती देऊन त्यांनीं बादशहाची खात्री पटवून दिली. बादशहानें वजीरखान नांवाच्या सेनापतीस गुरूस दिल्लीस आणविण्यासाठीं पाठविलें. दिल्लीस निघण्यापूर्वीं गुरु हरगोविंदानें आपल्या शिष्यांस गुरु अर्जुनाप्रमाणेंच उपदेश केला. तो म्हणाला, "शिष्यांनो, मी दिल्लीस जात आहें खरा पण मी सुखरूप परत येईनच असं सांगतां येत नाहीं. तरी तुम्ही धैर्य न सोडतां शीखधर्माचं रक्षण करा. माझ्या पश्चात् गुरुदास माझं कार्य करील. तुम्ही सर्व एकमतानें वागून सावध असा."

स्वसंरक्षणासाठीं अनेक स्वार बरोबर घेऊन गुरु दिल्लीस गेला. देखणा, हुशार, शूर व तेजःपुंज अशा हरगोविंदाला पाहून बादशहा त्याजवर अत्यंत खूष झाला. त्यानें त्याला शीख धर्माचीं तत्त्वें कोणतीं म्हणून प्रश्न केला. गुरूनें उत्तर दिलें, "ज्या अर्थीं सर्व मानव ईश्वराचीं लेकरें आहेत त्या अर्थीं परस्परांत बंधुभाव असला पाहिजे. मानवाशीं द्वेष करणारा तो शत्रु समजून त्याचा नाश करणें इष्ट होय. स्वकर्तव्यबुद्धीनें प्रजापालन करणारा तोच खरा राजा असतो व त्याला प्रजा परम आदर दाखविते. ऐश्वर्यमदानें धुंद होऊन अन्यायानें वागणारा राजा शिक्षेस पात्र असतो." वगैरे शीखधर्मतत्त्वें गुरूनें बादशहास नीट समजावून सांगितलीं. गुरूचें वाक्कौशल्य पाहून बादशहा संतुष्ट झाला इतकेंच नव्हे, तर त्यास द्रव्य व सैन्य देऊन त्यानें कांहीं दिवस त्याला आपल्याजवळ ठेवून घेतलें.

गुरूचा होत असलेला हा सन्मान पाहून चंदुलाल अधिकच चिडला. त्यानें पुन्हा बादशहाचे कान भरून गुरूवर आरोप लादण्याचा प्रयत्न केला. गुरूला शिकारीचा नाद होता; त्यामुळें प्रसंगीं जंगलकायदेभंग करूनही

**********************************************

तो बादशाहाच्या राखीव जंगलांत बिनधोक शिकार करी. बापाच्या दंडाची रक्कमही त्यानें अद्याप बादशहाकडे पाठविली नव्हती. अशा अनेक कारणांनीं जहांगीरचें मन गुरु हरगोविंदाबद्दल पुन्हा कलुषित झालें. अखेरीस गुरूला पकडून ग्वालेरच्या किल्ल्यांत कैद करून ठेवण्यांत आलें व किल्ल्याभोवतीं कडेकोट बंदोबस्त करण्यांत आला. अमृतसरला ही बातमी कळतांच सर्व शीख शस्त्रास्त्रांसहित ग्वालेरच्या किल्ल्याभोवतीं जमा झाले. ह्याच वेळीं उत्तरेस बादशाहाच्या सैन्यांतच बंडाळी माजली. त्या समयीं शीखांकडून बादशहाच्या सैन्यास मुळींच मदत मिळाली नाहीं. अखेर सर्वत्र राजद्रोही वातावरण निर्माण झालें होतें. ह्या सर्व परिस्थितीला कारण गुरु हरगोविंदाला बादशहानें अन्यायानें केलेली अटक हेंच होतें. गुरूची मुक्तता केल्याविना उत्तरेंतील परिस्थिति शांत होणार नाहीं असें बादशहास सांगण्यांत आलें तेव्हां लगेच बादशहानें गुरूची ग्वालेर किल्ल्यांतून मुक्तता केली.

आपण सर्वदा बादशहास साहाय्य करण्यास तयार असतों परंतु बादशहाचे कान फुंकून द्वेषपूर्ण परिस्थिति उत्पन्न करणारा चंदुलाल हाच एक दुष्ट मनुष्य आहे, अशी गुरूनें बादशहाची खात्री करून दिली. त्यास आपल्या स्वाधीन करावें अशी गुरूनें बादशहाजवळ इच्छा दर्शविली. बादशहानें चंदुलालला गुरूच्या स्वाधीन केलें. त्याला घेऊन गुरु अमृतसर येथें आला. गुरूनें आपला दरबार भरवून सर्व शीखांसमोर त्याला त्याच्या पापाची जाणीव करून दिली व आपली पितृवधसूडाची प्रतिज्ञा सांगितली. अखेरीस अत्यंत क्रूर उपायानें चंदुलालचे हाल करण्यांत आले. त्याच्या पायांना दोर बांधून त्यास भर रस्त्यांतून फरफटत ओढून आणविलें व सर्पाप्रमाणें ठेचून मारण्यांत आलें. गुरु हरगोविंदानें आपली प्रतिज्ञापूर्ति करून स्वर्गातील पित्याच्या आत्म्यास शांति दिली.


गुरूवर शीखांचें इतकें प्रेम असे कीं गुरु ग्वालेर किल्ल्यांत असतेवेळीं हजारों शीख नम्रतापूर्वक त्या किल्ल्याच्या भिंतीवर डोकीं घाशीत व स्वतःला धन्य मानीत. त्याच वेळीं बादशहा आजारी झाला. कोणीं एका फकिरानें

********************************************

त्यास सांगितलें कीं "गुरु हरगोविंदासारख्या साधु पुरुषाला कैदेंत ठेवल्यामुळेंच हा आजार झाला आहे." ह्याही गोष्टीचा बादशहाच्या मनावर परिणाम होऊन गुरूची मुक्तता झाली. तुरुंगवासानंतर गुरु हरगोविंदानें स्वतःचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं हिमालयांत कांहीं काळ घालविला. परत आल्यावर अनेक शीख त्याच्या झेंड्याखालीं जमा झाले. मोगलांशीं लढण्याचे प्रसंगही गुरूला ह्याच वेळीं आले. ह्याच सुमारास जहांगीर बादशाहा मरण पावला व शहाजहान दिल्लीच्या गादीवर बसला. शहाजहान स्वतः जरी शांत स्वभावाचा होता तरी इतरांनीं त्याचें मन शीखांबद्दल कलुषित केलेलें होतें. पुन्हा बादशहाशीं कलह उद्भवण्यास एक कारण घडलें तें असें :

एकदा कांहीं शीख तुर्कस्थानांतून आपल्या गुरूकरितां घोडे आणीत असतां लाहोरच्या मोगल अधिकाऱ्यानें ते पकडून बादशाहास नजर केले. हे उत्तम अवलादीचे घोडे पाहून बादशहा फार खूष झाला. त्यांपैकीं एक घोडा गुरूला देण्यासाठीं आणलेला होता तो काजीनें ठेवून घेतला होता. गुरु हरगोविंदास ही हकीकत कळतांच त्यानें काजीवर हल्ला करून तो घोडा परत मिळविला. काजीच्या जनानखान्यांत इस्लामधर्माची दीक्षा दिलेली एक हिंदु तरुणी होती. गुरूनें मोठ्या युक्तीनें त्या कुमारी कौलनची तेथून सुटका केली व तिच्या शीलास पुन्हा धोका पोहोचणार नाहीं अशी व्यवस्था करून दिली. कौलसर नांवाचें मंदिर हें गुरूनें केलेलें ह्याच अबलेचें स्मारक होय. ह्या कारणावरून लाहोरचा मोगल अधिकारी व काजीचीं मुलें ह्यांनीं मिळून गुरुवर हल्ले केले, परंतु शेवटीं गुरु हरगोविंदालाच त्यांत यश मिळालें.

गुरूला मोगलांशीं लढण्याचा आणखी एकदा प्रसंग आला. लाहोरचा एक शीख व्यापारी कांहीं घोडे अमृतसरला गुरूस अर्पण करण्यास जात असतां लाहोरच्या मोगल अधिकाऱ्यानें त्यांतील दोन उत्तम घोडे स्वतःकरितां जबरदस्तीनें ठेवून घेतले. व्यापाऱ्यानें ही हकीकत गुरूस कळविली. गुरूनें ते दोन घोडे परत मिळविण्याची इच्छा दर्शवितांच बिधीचंद नांवाचा एक शीख पुढें आला. बिधीचंदानें गवत कापणाराचा



एका काळोख्या रात्रीं बिधीचंदानें किल्ल्याच्या तटावरून
खालीं नदींत घोडा फेकला.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

वेप करून मोगल सैन्यांत प्रवेश केला व तबेल्यांत मोतद्दारी पत्करली. रावी नदीचा एक फाटा लाहोर किल्ल्याच्या बाजूनें वाहात असे. एका काळोख्या रात्रीं गुरूच्या घोड्यावर स्वार होऊन बिधीचंदानें किल्ल्याच्या तटावरून खालीं नदींत घोडा फेकला व तो सुरक्षितपणें गुरूकडे येऊन पोहोचला. बिधीचंदाचें हें धाडस पाहून गुरूनें त्यास शाबासकी दिली पण त्याबरोबरच त्या घोड्याचा जोडीदार दुसरा घोडा आणण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्या वेळीं बिधीचंदानें हेराचें सोंग घेतलें. इकडे चोरीस गेलेला घोडा शोधण्यासाठीं मोगल अधिकाऱ्यानें चारी दिशांस आपले हेर पाठविले. बिधीचंदानें ही संधि साधून राजवाड्यांत प्रवेश केला व हेराची नोकरी पत्करली. जेथून घोडा चोरीस गेला होता तेथें आपल्याशिवाय कोणींही राहूं नये असा बिधीचंदानें हुकूमही मिळविला. चोराची वाट पाहात ह्या हेरानें कांहीं दिवस तेथेंच घालविले. एके दिवशीं संधि साधून त्यानें दुसऱ्याही घोड्यावर स्वार होऊन तटावरून खालीं खोल नदींत घोडा फेकला. नदीपार झाल्यावर तो ओरडून म्हणाला, "घोडे नेणारा चोर मीं पकडलेला आहे आणि त्याचं ठिकाणही मला माहीत आहे. तरी ह्या घोड्याचा मालक जो कोणी असेल त्यानें पुढें येऊन चोरीस गेलेले घोडे घेऊन जाण्याची व्यवस्था करावी." बिधीचंद सच्चा शीख होता. मोगल अधिकाऱ्याला चोर दाखवून त्यानें त्याची चाकरी इमानेंइतबारें बजावली. मुद्देमालासह चोर पकडून, घोडे नेणारा खरा चोर कोण हें मोगल अधिकाऱ्याला दाखवून दिलें. घोड्यांचा खरा मालक गुरु हरगोविंद कीं मोगल अधिकारी ह्याचा निकाल भर रस्त्यावर लावून दिला. गुरूला घोडे फार प्यार होते. ही उमदी अरबी घोड्यांची जोडी पाहून गुरूला अतिशय आनंद वाटला. त्यानें बिधीचंदाला शीख सैन्यांत मोठा हुद्दा देऊन त्याचा गौरव केला. घोडे परत मिळविण्यासाठीं त्या अधिकाऱ्यानें गुरूवर स्वारी केली पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. पराजय पावून तो दिल्लीस पळून गेला व सर्व हकीकत त्यानें बादशहाच्या कानांवर घातली.

७८५२

गुरु हरगोविंदाचें उत्तरेंत किती प्रस्थ वाढलें आहे, त्याची सैन्यसंघटना बादशाही उलथून पाडण्यास कशी समर्थ बनली आहे, द्रव्यसंचय करून व किल्ले बांधून स्वसंरक्षणाची गुरूनें कशी तयारी केली आहे, वगैरे इत्थंभूत हकीकत त्यानें शहाजहान बादशहास सांगितली. बादशाहानें गुरु हरगोविंदाला पकडून आणण्यास सेनापतीस पाठविलें. युद्ध होऊन मोगलांचा पराभव झाला. गुरु स्वसंरक्षणार्थ पर्वतांत जाऊन राहिला. कांहीं वर्षांनंतर तो पुन्हा अमृतसर येथें येऊन राहूं लागला. ही बातमी लागतांच पुन्हा बादशाहानें त्यावर सैन्य पाठविलें. पण ह्या वेळींही गुरूचाच जय झाला. गुरूनें ह्यापुढें अमृतसर नगर सोडून काश्मीर रस्त्यावर सतलज नदीच्या किनारीं पर्वतपायथ्याशीं कीर्तिपूर नांवाचें शहर वसविलें. तो तेथें शांततेनें आयुष्य घालवीत असतां इ. स. १६४५ मध्यें मरण पावला. त्या वेळीं त्याच्या कांहीं शिष्यांनीं गुरूच्या चितेंत उड्या घेऊन आत्माहुति दिली, इतकें त्यांचें गुरूवर अढळ प्रेम होतें. गुरु हरगोविंदाचें पवित्र जीवन व त्याचा सदुपदेश ह्यांत इतकी आकर्षणशक्ति होती कीं गुरूच्या पश्चात् जगणें व्यर्थ आहे अशी शिष्यांची दृढ भावना बनलेली होती. आयुष्याच्या शेवटीं देखील त्यानें आपल्या धर्मभावनेनें अनेक शीख मिळविले होते.

[ १ ] गुरु हरगोविंदानें शीख-संघटनेंत कोणत्या सुधारणा केल्या ? [ २ ] पित्याच्या मृत्यूचा सूड घेण्याची गुरूची प्रतिज्ञा कितपत सफल झाली ? [ ३ ] बिधीचंदाच्या कामगिरीचें वर्णन करा. [ ४ ] गुरु अर्जुनसिंह व हरगोविंद ह्यांनीं शीखांत कशी क्रांति घडवून आणली ?

व. ६७०४


# ७. गुरु हरराय

आपल्या मुलांत गुरुपदाकरितां भांडणें होतील म्हणून गुरु हरगोविंदानें आपल्या मागें आपल्या नातवास गुरुपदाचा अधिकारी नेमलें. ह्या वेळीं गुरु हरराय ह्याचें वय अवघें १४ वर्षांचें होतें. गुरु हरगोविंदाच्या कारकीर्दींत शीखांचा बराच काळ धामधुमींत गेला होता. त्यांना विश्रांति मुळींच मिळाली नव्हती. शिवाय सतत लढाया करून शीखसैन्य कमी होऊन शीखसंघटनाच नामशेष होण्याची भीति असल्यानें हररायच्या वेळीं शीखांनीं शांतता स्वीकारली होती. ह्याला दुसरेंही एक कारण होतें. गुरु हरराय स्वत: शांततावादी होता. लढण्यापेक्षां त्याला एकान्तवास अधिक आवडत असे. तो इतक्या कोमल अंत:करणाचा होता कीं एकदा तो बागेंत फिरत असतां त्याच्या झग्यानें कांहीं फुलें चुरगळून जमिनीवर पडलीं, तेव्हां तो हळहळूं लागला. फुलांच्या नाशानें दु:खी होणारा हरराय मोगलांविरुद्ध लढण्यास कसा तयार होईल? पुढारीच इतका शांतताप्रिय, तर सैनिकांस लढण्यास उत्तेजन तरी कसें मिळणार? जहांगीर व शहाजहान हे मोगल बादशहा जरा चैनी व शीखांविषयीं उदारमतवादी असल्यानें त्यांच्या कारकीर्दींत शीखांच्या लढाऊ वृत्तीला वाव मिळाला पण ह्या वेळीं स्वत: गुरु हरराय शांतताप्रिय व भावांना ठार करून आणि बापाला कैद करून

**************************************************

गादी बळकावणारा औरंगजेबासारखा बादशहा, अशा परिस्थितींत शीख सैन्य मोगलांशीं आपण होऊन लढण्यास धजेना.

इच्छेविरुद्ध कां होईना, पण गुरु हरराय ह्यास औरंगजेबाशीं लढण्याचा प्रसंग आलाच. एकदा औरंगजेबाचा वडील भाऊ दारा आजारी असतांना गुरूनें त्याला औषध देऊन बरा केला होता. त्या वेळेपासून दाराची गुरु हररायवर श्रद्धा बसली व गुरूबद्दल त्याला अत्यंत आदर वाटूं लागला. गुरूच्या निःस्वार्थी व धार्मिक वृत्तीमुळें दारा तर त्याच्याशीं मित्रत्वाच्या नात्यानेंही वागत असे. औरंगजेबाचें सैन्य ज्या वेळीं दाराचा पाठलाग करीत होतें त्या वेळीं दारा गुरु हररायच्या आश्रयास येऊन राहिला होता. गुरु हररायनें आपली शीख सैनिकांची एक तुकडी पाठवून औरंगजेबाच्या सैन्यास पिटाळूनही लावलें होतें, ही गोष्ट औरंगजेब विसरला नव्हता. ह्यानंतर लवकरच आपल्या सर्व भावांना ठार करून औरंगजेब दिल्लीच्या गादीवर बसला व दाराला आश्रय देणाऱ्या गुरु हररायच्या नाशाचा प्रयत्न करूं लागला. कांहीं एका उत्सवाच्या निमित्तानें औरंगजेबानें आपल्या सेनापतीस सैन्य देऊन गुरु हररायला आपल्या दरबारीं सन्मानानें बोलावून आणण्यास पाठविलें. गुरु हररायनें ती आज्ञा तुच्छ मानून आपला वडील मुलगा रामराय ह्यास पाठविलें. रामराय दरबारांत गेला तेव्हां औरंगजेबाचें ऐश्वर्य पाहून स्वाभिमान विसरून त्यानें बादशहास लवून मुजरा केला. त्याचा नम्र स्वभाव पाहून औरंगजेबानें त्याला आपल्याजवळ ठेवून घेतलें. रामरायला बादशहानें अत्यंत मायाळूपणानें वागविलें व 'पंजाबांत शीखांकडून शांतता राखली जावी म्हणून रामराय ह्यास बादशहानें आपल्या दरबारीं पाहुणा म्हणून ओलीस ठेवून घेतलें आहे' असा गुरु हररायकडे निरोप पाठवून दिला. रामराय ह्यास बादशहानें डेहराडून येथें जहागीरही दिली. बादशहाचा निरोप ऐकून गुरूला आश्चर्य वाटलें. गुरूनें आपलें कार्य मुळींच न थांबवितां उत्तरेंत 'नाभाप्रतिआळ' ह्या नांवानें एक शीख राज्य स्थापन केलें.



रामरायनें स्वाभिमान विसरून बादशहास लवून मुजरा केला.

************************************************

औरंगजेबाच्या पूर्ण कह्यांत जाऊन, स्वकर्तव्य, स्वाभिमान, स्वधर्म सर्व विसरून रामराय अगदीं सत्त्वहीन बनलेला पाहून गुरु हरराय ह्यास अत्यंत खेद वाटला. अनेक वेळां त्याला ह्यांपासून परावृत्त करण्याचा त्यानें प्रयत्न केला पण व्यर्थ. एकदा दरबारांत बादशहानें पूज्य आदिग्रंथ व शीखधर्म ह्यांची निर्भर्त्सना केली असतां रामरायनें बादशहाच्या भीतीनें त्याला संमतिदर्शक मान डोलविली. ही वार्ता ऐकून गुरु अतिशय संतापला. सर्व शिष्यांना जमवून त्यानें सांगितलें कीं "रामराय औरंगजेबाजवळ कुत्र्याप्रमाणें लाळ घोटत आहे. पूज्य नानकाच्या आदिग्रंथाला तो असत्य मानतो. हा आपल्या धर्मावर—गुरुचरित्रावर एक कलंक आहे. तरी ह्यापुढें माझा रामरायशीं कोणताही संबंध नसून तो गुरुपदावर येण्यास नालायक आहे, असें मी सांगूं इच्छितों."

ही बातमी रामरायला दिल्लीला कळली तेव्हां तो बादशहाच्या आज्ञेनें अमृतसरला जाण्यास निघाला; परंतु गुरु हररायनें त्याचा निषेध करून अत्यंत उग्र शब्दांत त्याची निर्भर्त्सना केली व दूताकडून त्यास निरोप पाठविला कीं "हे दुष्ट पुत्रा, तुला पुत्र म्हणण्याची मला लाज वाटते. ज्या पूज्य गुरुपीठांत तुझा जन्म झाला, त्या गुरु नानकाची वाणी असत्य मानतोस? धिक्कार असो तुझ्या जीवनाला! बंधु व पिता ह्यांचा नाश करणाऱ्या औरंगजेबाच्या भयानें तूं जर पूज्य नानकाला दोष देण्यास धजतोस तर तूं धर्मसंरक्षण कसं करशील? तूं बापाला बाप देखील म्हणणार नाहींस! फक्त जन्मानें पुत्राचं कार्य संपत नाहीं, तर पुत्रधर्माच्या आचरणानें तें पूर्ण करायचं असतं. मानवेतर प्राणी कधीं मातृपितृभक्त झालेले आहेत काय? पितृसेवा म्हणजेच पुत्रधर्म नाहीं. ती सेवा तर एखादा भाडोत्री सेवकही करूं शकतो. पुत्रधर्माचं पालन हीच खरी पितृसेवा होय. ती तूं करण्यास विसरलास. आपल्या पवित्राचरणानें पित्यास संतुष्ट करणं हाच पुत्राचा धर्म होय. शीखधर्म व पूज्य आदिग्रंथ ह्यांची भर दरबारांत तूं निंदा सहन केलीस हें पाहून स्वर्गस्थ गुरूंचे आत्मे तुला किती शाप देत

असतील! दुरात्म्या, आलास तसाच परत दिल्लीस जा. अमृतसरसारख्या पवित्र भूमीला तुझें अपवित्र तोंड दाखवूं नकोस."

हा तेजस्वी निरोप ऐकून रामराय उलट पावलीं परतला व दिल्लीस जाऊन औरंगजेबास त्यानें सर्व हकीकत सांगितली. औरंगजेब मात्र संतुष्ट झाला, कारण त्याला शीखगुरूचा पुत्रच सावज सापडलें व कलह उत्पन्न करण्यास उत्तम संधि प्राप्त झाली.

गुरु हरराय अत्यंत निःस्पृह व निग्रही होता. तो शांतताप्रिय असल्यामुळें मोगलांशीं लढाया करण्याचे प्रसंग त्यानें टाळले इतकेंच नव्हे, तर शांतता प्रस्थापित करण्यांतच आयुष्य घालविलें. बरींच घराणीं शीखधर्मांत सामील करून त्यानें धर्मप्रसाराचें बरेंच कार्य केलें. गुरु हरराय इ. स. १६६१ त मरण पावला.

[१] गुरु हरराय ह्याच्या स्वभावाचें वर्णन करा. [२] रामरायची गुरु हररायनें कां व कशी निर्भर्त्सना केली? [३] मागील गुरूप्रमाणें गुरु हररायची कारकीर्द विशेष धामधुमींत न जातां शांततेंत कां गेली?

# ८. गुरु हरकिसन

औरंगजेब हा अत्यंत धूर्त व राजकारण-कुशल मोगल बादशाहा होता. तो जें कार्य हातीं घेई त्याची सुरुवात तो अशा रीतीनें करीत असे कीं त्या कार्याच्या बुडाशीं त्याचा कोणता हेतु आहे व त्याचा शेवट कसा होईल ह्याची कोणासच अटकळ बांधतां येत नसे. प्रथम दर्शनीं तें कार्य अत्यंत हितकर दिसायचें व त्याचा शेवट मात्र वाईट रीतीनें व्हावयाचा हें ठरलेलेंच असे. बादशहाची एखाद्या मनुष्याशीं वागणूक अत्यंत दयाळूपणाची, भाषण अत्यंत मधुर, चेहेरा आनंदी दिसायचा, पण त्याच वेळीं त्याच्या मनांत निराळेंच असायचें. अशीच स्थिति गुरु हरराय मरण पावला त्या वेळीं झाली. गुरु हररायनंतर त्याचा वडील मुलगा रामराय गुरुपदावर यावयास पाहिजे होता; परंतु त्या वेळीं तो औरंगजेबाच्या नजरकैदेंत होता. हा डाव सुरुवातीला कोणालाच कळला नाहीं. बादशहानें मात्र मोठ्या युक्तीनें आपलें कार्य साधून घेतलें. पुढील धोरण जाणून गुरुपदाचा वारस आपल्या दरबारीं आणून त्यास ओलीस म्हणून त्यानें पूर्वीच ठेवून घेतलें होतें. त्याच्या मुळाशीं हेतु हाच होता कीं गुरु हररायनंतर गुरुपदाबद्दल रामराय व हरकिसन ह्या भावांत तंटा लागावा, खरा हक्कदार जो रामराय त्याच्या वतीनें आपण तंटा मिटवावा व भावी गुरूला आपल्या कबज्यांत घ्यावें. बादशहाची

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

रामरायशीं वर्तणूक अशी असे कीं तिच्यापुढें आईबापांचें प्रेम फिकें पडावें. मराठ्यांच्या इतिहासांतील छत्रपति शाहूमहाराजांप्रमाणें औरंगजेबानें रामरायची स्थिति केली होती. रामरायला बादशहाचा ळळा व दरबारी राहाणीची चटक इतकी लागलेली होती कीं शीखधर्मापेक्षां बादशहाची मर्जी संपादन करणेंच त्यास अधिक आवडत असे. गुरु हररायनें रामरायची ही स्थिति पाहून गुरुपदावर हरकिसन ह्या आपल्या धाकट्या मुलास बसविलें. नंतर रामरायनें गुरुपदाच्या वारसा हक्काबद्दल बादशहाकडे तक्रार केली व तो स्वतःच अमृतसरला येण्यास निघाला. तेथील सुवर्णमंदिराच्या व्यवस्थापकांपैकीं कांहींना स्वतःला अनुकूल करून घेण्याचा त्यानें प्रयत्न करून पाहिला परंतु ते सर्व रामरायचें पूर्ववृत्त जाणून होते. त्यांनीं त्याचा धिक्कार करून त्यास वाटेस लावलें. नंतर तो दिल्लीस गेला व त्यानें बादशाहास सर्व वृत्तान्त सांगितला. तो म्हणाला, "राजेश्वरा ! मी आपल्याजवळ राहून पित्याच्या रोषाला कारण झालों. सर्व शीख माझे शत्रु बनून त्यांनीं बाल हरकिसन ह्यास गुरुपदावर बसविलें. माझा पिता शांत स्वभावाचा होता, परंतु त्याचे अनुयायीच त्याला बादशहाविरुद्ध कारस्थानें करण्यास उत्तेजन देत असत. आपली सत्ता नष्ट करून उत्तरेंत शीखसत्ता स्थापन करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. आपण जर मला साहाय्य कराल तर त्या सर्वांना उत्तरेंतून पिटाळून लावून आपली सत्ता मी तेथें दृढ करूं शकेन. हरकिसन लहान बालक असल्यानें पंजाबांत दंगेधोपे होऊन धुमाकूळ माजण्याचा संभव आहे; तरी आपण माझ्या हाताखालीं कांहीं सेना द्यावी अशी विनंती आहे !"

बादशहानें हरकिसनला आपल्या दरबारीं दिल्लीस येण्याचा हुकूम घेऊन सैन्य पाठविलें. आपल्या मातेची आज्ञा व शिष्यगणांचा विचार घेऊन गुरु हरकिसन कांहीं शिष्यांसमवेत दिल्लीस येऊन बादशहास भेटला. रामरायप्रमाणें हरकिसन दिल्लीदरबारच्या वैभवास भुलला नाहीं. स्वतःच्या योग्यतेप्रमाणें वागून त्यानें बादशहावर आपली छाप बसविली.

*****************************************************

बादशहा हरकिसनचें वैराग्यपूर्ण भाषण व निःस्पृहता पाहून खूष झाला. तो रामरायला म्हणाला, " बाल हरकिसनची वैराग्यपूर्ण, परोपकारतत्पर बुद्धि पाहून माझ्या मतें तुझ्यापेक्षां तोच गुरुपदाला अधिक लायक आहे, तरी तूं गुरुपदाचा नाद सोडून दे. राज्यपद शस्त्रास्त्राच्या बळावर मिळवितां येतं पण गुरुपद मिळविण्याला वैराग्यवृत्तिच अंगीं बाणली पाहिजे. तुझ्या अंगीं तो गुण नसल्यानें तूं ह्या पदाकरितां प्रयत्न करूं नकोस." बादशहाचें रामरायवर प्रेम असूनही त्यानें हरकिसनचाच गुरुपदावर वारसाहक्क कबूल केला ह्यांत बादशहाचा कांहीं कपटी डाव जरी असला तरी हरकिसनची चाणाक्ष बुद्धि व हुशारी हे गुणही त्यास कारण होते हें स्पष्ट दिसून येतें.

गुरु हरकिसन अत्यंत हुशार व पाणीदार मुलगा होता. त्याच्या चलाख बुद्धीची बादशहानें पहिल्याच भेटीच्या वेळीं परीक्षा केली होती. त्याच्या गुणांची कीर्ति सर्व शहरभर पसरली. त्याच्या दर्शनाकरितां लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटूं लागल्या. बादशहाच्या जनानखान्यांतील स्त्रियांनींही बालगुरूचें दर्शन घेण्याची इच्छा दर्शविली. एका भव्य मंदिरांत सर्व स्त्रिया आपापल्या जागांवर बसल्या. हरकिसनला बसण्यास जागा ठेवली नव्हती. चतुर हरकिसननें स्त्रियांचा हा अपमानास्पद कपटी डाव ओळखला. लगेच तो बादशहाच्या पट्टराणीच्या मांडीवर जाऊन बसला. तो म्हणाला, " राणीसाहेब, आपण खरोखर माझ्या माता आहांत. आम्ही शीख परस्त्री मातेसमान मानतों. आमच्या धर्मांतील हें मुख्य तत्त्व आहे." बाल गुरूचें हें चातुर्य व मधुर वाणी ऐकून राण्या व बादशहाही संतुष्ट झाला.

एकदा औरंगजेबानें आपल्या हातानें हरकिसनचे दोन्ही हात धरून म्हटलें, " मी जर आतां तुला मारलं तर तूं काय करशील ?" त्या समयसूचक मुलानें उत्तर दिलें, " महाराज, आपल्यासारख्या सम्राटाच्या हातीं माझे दोन्ही हात असल्यावर मला जगतांत एका परमेश्वराशिवाय



चतुर हरकिसन पट्टराणींच्या मांडीवर जाऊन बसला.

*********************************************

कुणाचं भय असेल बरं!" हें उत्तर ऐकून बादशहा फारच खूष झाला. त्याचें गुरु हरकिसनवर अधिकच प्रेम जडलें. गुरु हरकिसनसारखा स्वरूपवान्, हुशार व बोलका मुलगा पाहून बादशहाला फार आनंद वाटे. त्याच्या ह्या गुणांवर लुब्ध होऊनच त्यानें गुरुपदाचा वारसाहक्क रामरायचा असूनही हरकिसनलाच दिला.

हा दुर्दैवी गुरु फारच अल्पकाळ जगला. इ. स. १६६४ मध्यें त्यास देवी येऊन तो मृत्युमुखीं पडला. मरणापूर्वीं त्यानें सर्व शिष्यांस बोलावून गुरु नानकदेवानें लाविलेल्या शीखधर्मवृक्षाचें नीट संगोपन करण्यास सांगितलें व 'बकाला' नांवाच्या गांवांतील कोणी एक सामान्य पुरुष शीखधर्मदीप प्रज्वलित करील असें भविष्य वर्तविलें. ह्या उपदेशाप्रमाणें शीखांनीं धर्मप्रसाराचें कार्य पुढें चालविलें.

[१] रामरायनें गुरुपद मिळविण्यासाठीं काय प्रयत्न केले व त्यांत त्याला कितपत यश प्राप्त झालें? [२] गुरु हरकिसनच्या चातुर्याच्या एक दोन गोष्टी सांगा. [३] गुरु हरकिसन अल्पायुषी झाला नसता तर शीखधर्मप्रसार कितपत वाढला असता असें तुम्हांला वाटतें?

# १. गुरु तेघबहादुर

गुरु हरकिसनच्या मृत्यूनंतर त्याच्या भविष्याचा फायदा घेऊन बकाला गांवचे अनेक लोक गुरुपदाकरितां झटूं लागले. सर्व शीखसमाजापुढें गुरुपद कोणास द्यावें हा एक मोठाच प्रश्न उभा राहिला. दिल्लीचा सुखन नांवाचा एक व्यापारी स्वतः बकाला गांवीं गेला व तेथें त्यानें सोढी वंशाचा शोध केला. तेथें त्याला एक व्यक्ति आढळली. तीच व्यक्ति नववा शीख गुरु तेघबहादुर होय.

सहावा शीख गुरु हरगोविंद ह्याला दोन मुलगे असतांना एकालाही गुरुपद न देतां नातू हरराय ह्याला त्यानें गुरु नेमलें होतें, हें मागें आपण वाचलेंच आहे. दोघा मुलांत पुढें कलह माजून शीखधर्मावर संकट येऊं नये हा त्याचा हेतु होता. गुरु हरराय हा गुरु हरगोविंदच्या वडील मुलाचा मुलगा होता. ह्यापुढें हें गुरुपद वडील मुलाच्याच वंशांत चालेल व आपला दुसरा पुत्र अत्यंत विरक्त व परमेश्वरभक्त असूनही त्याला गुरुपदाचा लाभ मिळत नाहीं हें पाहून त्याची पत्नी नानकीदेवी हिनें आपल्या ह्या दुसऱ्या मुलाला गुरूचे शुभाशीर्वाद मिळावेत म्हणून आपल्या पतीला विनविलें. पुत्रादिकांचा भाग्योत्कर्ष आईबापांच्या हातीं नसून त्यांच्याच कर्मानें होत असतो अशी गुरु हरगोविंदनें आपल्या पत्नीची समजूत घातली आणि एक खड्ग, एक महावस्त्र व एक मोत्यांची माळ

******************************************

अशा तीन वस्तु देऊन, जेव्हां तुझ्या पुत्राचा भाग्योदय होईल तेव्हां त्याला ह्या वस्तु देऊन टाक असें तिला सांगितलें होतें. गुरु हरगोविंद वारल्यानंतर सती नानकीदेवी ह्या पुत्राला घेऊन बकाला ह्या गांवीं येऊन राहिली होती. तिनें त्याला शिक्षण दिलें. त्यानें बरींच तीर्थाटनें केलीं होतीं व आपल्या दयाळूपणानें व दानतीनें तो सर्वत्र विख्यात झाला होता.

सर्व शीखांनीं तेघलाच गुरुपदाला योग्य मानून गुरुपद स्वीकारण्याची विनंती केली. परंतु तेघनें अत्यंत नम्रतेनें, श्रीगुरुनानकाच्या पदावर बसण्यास आपण योग्य नाहीं असें सांगून ती विनंती अमान्य केली. शीखधर्मावर आलेलें महत्संकट निवारण्यास शीखांना कोणीतरी योग्य पुढारी असणें त्या वेळीं किती आवश्यक होतें ह्याची त्यांनीं त्यास जाणीव करून दिली. ह्याच वेळीं त्याची आई सती नानकीदेवी हिनें आपल्या पतीचे शुभाशीर्वाद सफल होण्याची हीच संधि आहे असें पाहून तेघला गुरुपद स्वीकारण्यास संमति दिली. मातेची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यानें गुरुपद स्वीकारलें. गुरु हरगोविंदचा वंशजच गुरु लाभला म्हणून सर्व शीखांना अत्यानंद झाला. पण कांहीं हितशत्रु होतेच. अनेकांनीं तेघचा नाश करण्याचे अनेक उपाय योजले, परंतु तेघ सर्वदा सावधान चित्तानें परमात्म्याची आराधना व शीखधर्मप्रसार करीत असल्यानें ह्या दुष्टांना त्यांत यश आलें नाहीं. कांहींच्या त्रासानें तर त्यानें अमृतसर सोडून कर्तारपूरजवळ आनंदपूर नगर वसविलें व तेथेंच तो राहूं लागला.

तेघबहादुर म्हणजे ( तेघ = तलवार ) तलवारबहादुर. नांवाप्रमाणेंच तो पराक्रमी होता. त्यानें बापाबरोबर पुष्कळ लढायांत शौर्य गाजविलें होतें. तरीही त्याला लढायांपेक्षां शांतताच अधिक प्रिय वाटे. युद्धांत अनेकांचे जीव घेऊन शौर्य गाजविण्यापेक्षां क्षुधितांना अन्न देऊन व पीडितांचें दुःख निवारण करून आयुष्य घालविणेंच त्याला आवडत असे. त्याची भूतदया व दयाळू वृत्ति पाहून असंख्य लोक त्याच्या झेंड्याखालीं जमा झाले. त्याचा दरबार भव्य असे पण त्याची राहाणी मात्र अगदींच साधी

असे. ' सच्चा पादशहा ' ही पदवी त्यास मिळालेली होती. सतलज नदीवर एक किल्ला बांधून तेथेंच त्यानें धार्मिक मठ व लष्करी ठाणीं स्थापन केलीं. गुरु तेघची ही हालचाल पाहून औरंगजेबाचे डोळे फाकूं लागले. बादशहाच्या पदरीं रामराय होताच. आपणांस गुरुपद मिळेल अशी अजूनही त्यास आशा होती. गुरु तेघच्या लोकप्रियतेचा तो मत्सर करूं लागला. तेघच्या चहाड्या सांगून त्यानें बादशहाचे कान फुंकण्यास सुरुवात केली. ह्याचा परिणाम असा झाला कीं पंजाब व काश्मीरमधील सर्व लोकांना मुसलमानी धर्माची दीक्षा देण्यांत यावी, असें बादशहानें फर्मान काढलें. गुरु तेघनें ह्या फर्मानास विरोध करण्यास सुरुवात केली. औरंगजेबाच्या जिझिया कराच्या जुलमानें तर अखिल हिंदु इतके गांजले होते कीं त्यांना अशा एखाद्या हिंदु पुढाऱ्याच्या आश्रयाची आवश्यकताच होती. ह्या बादशाही जुलुमाविरुद्ध उदेपूरचा राणा राजसिंह ह्यानेंही औरंगजेबास कडक भाषेंत एक पत्र लिहिलें होतें. दक्षिणेंतही ह्या वेळीं शिवाजीस राज्याभिषेक होऊन मराठे बादशाहीविरुद्ध उठले होते. एकदा कित्येकांनीं औरंगजेब दिल्लींतून हत्तीवरून चालला असतांना त्यास आपली करुण कहाणी सांगितली. तेव्हां बादशहानें त्यांकडे दुर्लक्ष करून आपला हत्ती पुढें चालविण्यास माहुतास आज्ञा केली. त्या वेळीं कित्येक लोक हत्तीखालीं चेंगरून मेले पण बादशहास त्यांची दया आली नाहीं. तेघच्या कानांवर ही सर्व हकीकत घालण्यांत आली. त्यानें स्वतः बादशहाची भेट घेऊन त्याच्या ह्या जुलमी व अन्यायी कृत्याबद्दल त्याची निर्भीडपणें कानउघाडणी केली.

ह्याच वेळीं दक्षिणेंत श्रीशिवछत्रपतींना राज्याभिषेक होऊन हिंदुपद-पादशाही स्थापन झालेली होती. सर्वत्र ' मराठा तितुका मेळवावा ' ही एकच गर्जना ऐकूं येत होती. बादशहानें पाठविलेले बरेच खान शिवाजीनें लोळविले होते. सह्याद्रींत सर्वत्र ' हर हर महादेव ' ही गर्जना घुमत होती. मराठ्यांच्या गनिमी काव्यानें औरंगजेब पिसाळून गेला होता.

उत्तरेंत तेघची तलवार शीखधर्मरक्षणाकरितां खणखणत होती. सर्व दिशांनीं काहूर उठलेलें पाहून औरंगजेब संतापला व सुरुवातीलाच तेघला दाबणें बरें असा विचार करून बादशाहानें गुरूला पकडून आणण्याचा हुकूम सोडला.

सरळस्वभावी गुरु तेघ अनेक शिष्यांची अनुमति नसतांही दिल्लीस जाण्यास निघाला. औरंगजेबाचा दुष्ट कपटी स्वभाव जाणून अनेकांनीं गुरूस औरंजेबापुढें न जाण्याचा सल्ला दिला; परंतु सत्पक्षाभिमानी गुरूनें लोकांचें न ऐकतां दरबारांत प्रवेश केला. तेथें त्याला अतिशय अपमानानें वागविण्यांत आलें. गुरूला बादशहापुढें उभें करण्यांत आलें व बादशहा कांहीं अपमानास्पद भाषण करणार तोंच जयपूरचा राणा जयसिंह उठून म्हणाला, “हा गुरु किती निरपराधी आहे हें त्याची सात्त्विक व निर्विकार मुद्राच स्पष्ट सांगत आहे. खरा राजद्रोही अशा मुद्रेनें राजसिंहासनासमोर कधींच येणं शक्य नाहीं. तरी बादशहांनीं ह्या गुरूस एक वर्षपर्यंत मजबरोबर वंगदेशांत पाठवावं व त्याची परीक्षा पाहावी.”

जयसिंह अखेरीस तेघला मिळाला व अखेर हे दोघेही हिंदु एक झाले हें पाहून वरपांगी जरी बादशहानें संमति दर्शविली तरी तो मनांत सारखा जळफळत होता. बादशहाचें कपट ओळखून जयसिंह दुसऱ्या दिवशीं गुरु तेघसह बंगालकडे जाण्यास निघाला. गुरूनें आपले सर्व शिष्य परत पाठवून कांहीं थोड्या शिष्यांसह ह्या संधीचा फायदा घेऊन तीर्थक्षेत्रें पाहिलीं व धर्मप्रसाराचेंही कार्य केलें.

ह्या प्रवासांत गुरु तेघबहादुरानें अनेक लोकांना शीख धर्माचीं तत्त्वें पटवून दिलीं. अनेकांनीं तो धर्म स्वीकारला. अशा रीतीनें स्वकर्तव्य करीत गुरूचें एक वर्ष निघून गेलें. गुरु तेघला जयसिंहानें मोठ्या आदरानें स्वदेशीं पाठविलें व औरंगजेबाच्या मनांतील गुरूबद्दलचें किल्मिष नाहींसें केलें. परंतु रामरायसारख्या दुष्टांनीं पुन्हा बादशहाचे कान फुंकून त्याच्या

**************************************

मनांत गुरूबद्दल द्वेष उत्पन्न केला. बादशहा अगोदरच संतापला होता. त्यानें तेघला ताबडतोब पुन्हा पकडून आणण्याचा हुकूम पाठविला.

गुरु तेघला ही बातमी आगाऊच कळली होती. त्यानें आपल्या शिष्यांना बोलावून उपदेश केला. तो म्हणाला, "शिष्यांनो! दिल्लीपति हा आपल्या धर्माचा काळ आहे. धर्माचा नाश करण्यासाठीं तो अनेक प्रयत्न करीत आहे, परंतु आपला हा सत्यधर्म आहे. खालसा म्हणजे शुद्ध; खालसा धर्म म्हणजे शुद्धधर्म. हा अविनाशी आहे. श्रीनानकदेवानें स्थापिलेला, गुरु हरगोविंदप्रभृतींनीं प्रज्ज्वलित केलेला हा शीख धर्माग्नि लवकरच भडका घेऊन शत्रूला भस्मसात करील हें लक्षांत ठेवा. स्वराज्यसूर्य लवकरच उगवेल. तुम्ही आपलें कार्य करीत राहा. दिल्लीपतीचा कोपाग्नि भडकलेला आहे. त्याला शीखधर्माची आहुति हवी आहे. तत्पूर्वी मी आपला बळी देण्यास आज दिल्लीस जात आहें. शीखधर्माकरितां माझा देह कारणीं लागत आहे हें पाहून मी मला धन्य समजतों." हें भाषण होत असतांच यवनसेना येऊन थडकली. महात्मा तेघबहादुर उग्रस्वरूप धारण करून सैन्याच्या पुढें झाला. शीखांनीं अनेक यवन कापून काढले. त्यांचें शौर्य पाहून शत्रुही विस्मयानें चकित झाले.

ह्या युद्धांत शीख जरी यशस्वी झाले तरी बरेच शीख कामीं आल्यानें त्यांचें बल कमी झालें होतें. मुसलमानांनीं पुन्हा सैन्य आणून त्यांवर हल्ला केला व गुरु तेघला बंदी करण्यांत आलें. शीखांना अत्यंत वाईट वाटलें. शिष्यांना दुःखी झालेले पाहून गुरु म्हणाला, "शिष्यांनो! माझ्याकरितां दुःख करूं नका. बादशहाच्या पापांचा घडा माझ्या बलिदानानें पूर्ण भरणार आहे अशी परमेश्वरी इच्छा दिसते. त्याकरितां मी आपला देह अर्पण करण्यास आनंदानें दिल्लीस जात आहें. तुम्ही आपलं सामर्थ्य वाढवा व नवीन पुढारी निवडून धर्माचं रक्षण करा." असा उपदेश करून गुरूनें आपला पुत्र गोविंदसिंह ह्यास गुरुपदाचा अधिकारी नेमून दिलें. त्याला

*******************************************
आशीर्वाद देऊन तो म्हणाला, "वत्सा, माझी शेवटची इच्छा पूर्ण करण्याचं कार्य सुपुत्र म्हणून उत्तम रीतीनें पार पाड व मला स्वर्गांत येऊन भेट!"

राजद्रोहाच्या आरोपाखालीं पकडून कांहीं दिवसांनीं तेघला दिल्लीस पकडून आणलें. ही वार्ता कळतांच त्या महाभागाचें दर्शन घेण्यास लोकांचे थव्याच्या थवे शहराबाहेर लोटले. गुरु तेघ शृंखलाबद्ध असून परमशांत, प्रसन्नमुख योगीच दिसत होता. लोकांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. गुरु तेघसारख्या योगीजनाचा नाश करून शीखधर्म नष्ट होईल अशी बादशहाची कल्पना असल्यास ती अगदीं चुकीची असून शीख धर्माऐवजीं त्याच्या इस्लामी राज्याचा मात्र खास नाश होईल, असे विचार लोकांच्या मनांत येऊं लागले. गुरूला अत्यंत कडेकोट बंदोबस्तांत ठेवण्यांत आलें. गुरु तेघ साखळदंडानें बांधलेला होता. त्याच्या खोलीला मोठमोठाले जाड गज लावलेले होते. किल्ल्याला उंच भव्य भिंती होत्या. सभोवतीं नंग्या समशेरी घेऊन मुसलमानी सैन्य खडा पहारा देत होतें. अशाही परिस्थितींत गुरु तेघला रात्रीं गाढ झोप लागली. शीख गुरुपीठावर बसून अनेक श्रद्धाळू शिष्यगणांना सर्वधर्मतत्त्वाचा उपदेश करण्यांत ज्याचा काल जायचा, ज्याच्यापुढें अत्यंत नम्रतेनें, शुद्धान्तःकरणानें जनता हात जोडून उभी राहायची, परमेश्वरचिंतनांत जो सदा निमग्न असायचा तो वृद्ध महातपस्वी गुरु तेघबहादुर अशा ह्या नरकवत् कारागृहांत येऊन पडावा! तेथेंही त्यास गाढ निद्रा लागावी!! हा आत्मज्ञानी एक गतजन्मींचा योगभ्रष्ट स्थितप्रज्ञ मुनि असावा असेंच लोकांना वाटल्यास नवल नाहीं.

इस्लामधर्म स्वीकारीत असल्यास जीवदान मिळेल अशी त्यास अट घालण्यांत आली. त्यानें धर्मान्तरास खुषीनें तयार व्हावें, म्हणून त्यास क्रूरपणानें वागविण्यांत आलें. असह्य थंडी, उपवास, फटके, अपमानकारक शब्द, शीखधर्मनिंदा, शिरच्छेदाचें भय, इत्यादि अनेक उपायांनीं त्याला छळण्यांत आलें; परंतु तो महात्मा – धर्मात्मा – आपल्या धर्मापासून रतिभरही ढळला नाहीं. तो कांहीं रामराय नव्हता कीं दिल्लीपतीचें वैभव

पाहून भाळून जावा आणि स्वधर्माची त्यानें निंदा करावी. तो परममान्य गुरु श्रीनानकदेवानें स्थापित केलेल्या धर्मपीठाचा अधिकारी होता, हुतात्मा गुरु अर्जुनसिंहाचा नातू होता, रणवीर गुरु हरगोविंदाचें रक्त त्याच्या नसानसांतून खेळत होतें. स्वधर्मरक्षणार्थ तळहातावर शिर घेऊन निघालेला तेघबहादूर इस्लामधर्मापेक्षां मरणच पत्करण्यास तयार झाला. अखेरीस गुरूचा शिरच्छेद करण्याचा हुकूम झाला. शीखांनीं गुरूला सोडविण्याचे पुष्कळ प्रयत्न केले पण दुर्दैवानें त्यांत त्यांना यश आलें नाहीं. सर्व दिल्लीनगरांत गुरूची शिक्षा जाहीर करण्यांत आली.


दुसऱ्या दिवशीं असंख्य लोकांच्या झुंडी गुरूच्या दर्शनास लोटल्या. तें अखेरचें दर्शन होतें. गुरूला त्या जनताजनार्दनापुढें चांदणी चौकांत आणून उभें करण्यांत आलें. औरंगजेबही मोठ्या थाटानें तेथें उपस्थित झाला. त्यानें लोकांस हें प्रकरण काय आहे तें समजून सांगितलें. महंमदीधर्मविरोधकांना किंवा महंमदीयेतर धर्मप्रसारकांना आपल्या राज्यांत कसें फळ प्राप्त होतें हें दाखविण्यासाठीं सर्व लोकांस तेथें येण्यास मोकळीक ठेवली होती. शीखांनीं धर्मान्तर करण्यास तयार व्हावें म्हणून त्यांना ही एक दहशतच होती. परंतु शीख कट्टर स्वधर्माभिमानी होते. जे स्वधर्मापुढें आपले प्राण तुच्छ समजत त्यांना ह्या घोर शिक्षेचें भय काय वाटणार! लोखंडी साखळदंडानें जखडलेला अनेक दिवसांचा क्षुधित महायोगी गुरु तेघबहादुर मृत्यूसमोर उभा असतांही प्रसन्नमुद्रेनें जनता-जनार्दनाला पाहून परम संतुष्ट झाला. धर्मान्तर केल्यास जीवदानच काय, पण अलोट संपत्ति व राजसत्ताही मिळेल असें त्यास औरंगजेबानें आमिष दाखविलें.

गुरूनें शांतपणें उत्तर दिलें, " प्रजाजनांना छळणारा व त्यांचं सर्वस्व हरण करणारा आमचा राजा असूं शकत नाहीं. द्रव्यापेक्षां आम्हांला धर्म अधिक प्रिय आहे. तूं स्वतः तरी आपल्या धर्माज्ञेप्रमाणें कुठें वागतोस? बाप आणि बंधु ह्यांना मारावं असं तुझ्या धर्मांत कुठेंच सांगितलेलं नाहीं. जगांतील

**********************************************
कोणत्याही वस्तूचं आमिष मला भुलवूं शकणार नाहीं. तूं जरी मजवर राजद्रोहाचा आरोप केला असलास तरी जोंपर्यंत हे माझे बांधव मला दोषी ठरवूं शकत नाहींत तोंपर्यंत मी पूर्ण निर्दोषी आहें असं मी समजतों. तुला जसा तुझा धर्म प्रिय आहे तसाच मलाही माझा धर्म प्रिय आहे. मला बलात्कारानें धर्मान्तर करण्यास लावण्याचा तुला मुळींच अधिकार नाहीं. मी आपला पवित्र धर्म सोडणार तर नाहींच पण तूं जर आतां मला मुक्त केलंस तर ताबडतोब पुन्हा मी स्वधर्मप्रसार करूं लागेन. गुरु नानकदेवाच्या अमृतमय उपदेशानें मी अमर झालों आहें. माझा शिरच्छेद म्हणजे माझा नाश नसून तुझ्या पापराशीची शीग आहे असं समज. ''

गुरूच्या ह्या तेजस्वी भाषणानें बादशहा अतिशय संतापला. त्याला संतापण्यास आणखी एक कारण घडलें असें म्हणतात. गुरु तेघ दक्षिणेकडे तोंड करून उभा होता. त्याच बाजूला औरंगजेबाचा जनानखाना होता. गुरु हेतुपुरःसर तिकडे पाहात होता असा त्यावर आरोप करण्यांत आला. "तूं दक्षिणेकडे कां पाहात होतास?" असें त्यास विचारण्यांत आलें. तो म्हणाला, "मजवरील हा आरोप खोटा आहे. मी दक्षिणेकडे पाहात होतों तो अशा हेतूनें कीं त्याच दिशेकडून येणारे लोक तुझं राज्य नष्ट करतील हें भविष्य मला दिसत आहे." बादशहानें गुरूच्या शिरच्छेदाची आज्ञा दिली. सैनिकानें खड्ग उभारलें. धर्मात्मा तेघबहादुर प्रसन्न मुद्रेनें शृंखलाबद्ध हात अर्धवट जोडून परमेश्वराची प्रार्थना करून म्हणाला, "हे गुरो, आमरण शीखधर्मसेवेचं व्रत मीं यथाशक्ति आचरिलं, स्वधर्माचा यथामति प्रचार केला. आज मी कृतकृत्य होऊन आपल्या चरणीं लीन होत आहें. आपण वाढविलेला हा शीखधर्मवृक्ष माझ्या रक्तसिंचनानें वर्धमान होवो हीच माझी अखेरची इच्छा आहे."

अखेरीस व्हायचें तेंच झालें. गुरूचें शिरकमल गुरुचरणीं अर्पण झालें. असें सांगतात कीं आपली मान मारेकऱ्याच्या तलवारीखालीं देण्यापूर्वीं गुरूनें आपल्या मानेभोवतीं एक कागद गुंडाळून ठेवला होता.



“ शीखधर्मवृक्ष माझ्या रक्तसिंचनानें वर्धमान होवो हीच माझी अखेरची इच्छा आहे. ”

शिरच्छेदानंतर तो कागद सापडला. तेव्हां त्यावर 'मान दिली पण इमान दिलें नाहीं' असा मजकूर लिहिलेला आढळला. शीखसमाज शोकसागरांत बुडाला. जनता दुःखाचे निश्वास सोडीत जड अंतःकरणानें घरीं परतली. शीखांनीं अन्त्य संस्काराकरितां गुरूचें कलेवर मागितलें असतां तें देण्यांत येऊं नये व कारागारांत लटकत ठेवून गिधाडांकडून खावविण्यांत यावें असा बादशाहाचा हुकूम झाला. गुरूचें कलेवर उचलून नेलें तेव्हां जनतेनें फुलें उधळून आपली भक्ति व्यक्त केली व गुरूच्या नांवाचा जयघोष केला. असें म्हणतात कीं एके रात्रीं तें शव एका हलक्या जातीच्या मनुष्यानें मोठ्या धैर्यानें व युक्तीनें काढून आणून गुरु तेघचा पुत्र गोविंदसिंह ह्याच्या स्वाधीन केलें. नंतर त्या शवाला यथाविधि आनंदपूर येथें अन्त्यसंस्कार करण्यांत आला. ज्या ठिकाणीं गुरु तेघचा शिरच्छेद करण्यांत आला त्या ठिकाणीं एक मंदिर उभारून त्यास शीरगंज हें नांव देण्यांत आलें. हाच प्रसंग पुढें कांहीं वर्षांनीं छत्रपति संभाजीमहाराजांवरही आला. गुरु तेघच्या वधाचा प्रकार मराठ्यांच्या इतिहासांतील तुळापूरची आठवण करून देतो. ज्या ठिकाणीं त्याच्या शवाला अग्नि देण्यांत आला त्या ठिकाणीं एक समाधि बांधण्यांत आली. ज्या मनुष्यानें तेघ बहादुराचें शव आणण्याचें धाडस केलें होतें, त्याला व त्याच्या जातीच्या लोकांना 'सिंग' हा किताब देण्यांत येऊन शूर योद्धे म्हणून त्यांचा समाजांत कायमचा दर्जा गुरु गोविंदसिंहानें वाढवून दिला. हल्लींच्या शीख सैन्यांतही त्याच लोकांचा विशेष भरणा आढळतो.

हजारों प्राण खर्ची घालून जी शक्ति उत्पन्न होऊं शकत नाहीं ती एका पुढाऱ्याचे प्राण खर्ची पडून कशी उत्पन्न होऊं शकते, हें गुरु तेघबहादुरनें आपल्या हौतात्म्यानें जनतेला दाखवून दिलें. मनुष्यप्राणी जर मरणाधीन आहे तर तें मरण राष्ट्र व धर्म ह्यांसारख्या उच्च कार्याकरितां कां पत्करूं नये ? हा विचार त्यानें प्रसृत केला. अशा मरणानें मृत्यूचें भय नष्ट होतें व जनतेंत साहस व निर्भयता हे सद्गुण उत्पन्न होतात, हें गुरु

तेघनें धर्माकरितां प्राण देऊन पटवून दिलें. गुरु तेघनें मरण पत्करलें, पण आपलें तत्त्व व धर्म ह्यांना तिलांजलि दिली नाहीं.

गुरु तेघबहादुर फक्त दहाच वर्षे गुरुपदावर होता. घरगुती भांडणें व औरंगजेबाचा ससेमिरा ह्यांस तोंड देण्यांतच त्याचा हा काल गेला. त्यामुळें तो अतिशय गांजला होता. अस्ताव्यस्त पसरलेलें शीखसैन्य जमवून मोगलांस तोंड देण्यास त्यास फुरसतच सापडली नाहीं. तरीही ह्या अल्पकाळांत त्यानें उत्तर हिंदुस्थानांत बराच प्रवास केला होता. त्याचा वध म्हणजे धर्मयज्ञांत दिलेली आहुति समजून लोक त्याला देवाप्रमाणें भजूं लागले. त्याच्या मृत्यूनंतर अखिल शीख गुरु तेघच्या वधाचा सूड घेण्यास टपून बसलेले होते. मोगलांवर सूड उगवून स्वधर्माच्या अपमानाची अंशतः तरी भरपाई करण्यास संधि मिळावी म्हणून अखिल पंजाब पवित्र्यांत उभा राहून एखाद्या पुढाऱ्याची वाट पाहात बसला. सुदैवानें गुरु तेघचा सुपुत्र गोविंदसिंह हा योग्य पुढारी त्यास लाभला.

[ १ ] गुरु हरकिसननंतर गुरु तेघ गुरुपदावर कसा आला? [ २ ] उदेपूरचा राणा जयसिंह ह्यानें गुरूवरील संकट कसें टाळलें? [ ३ ] मृत्यूपूर्वी गुरु तेघनें औरंगजेबाची कशी कानउघाडणी केली? [ ४ ] जीवन व धर्म ह्यांसंबंधींचे गुरु तेघबहादुरचे विचार सांगा. [ ५ ] गुरु तेघच्या वधानें मोगलांचें व शीखांचें कोणतें कार्य साधलें?

# १०. गुरु गोविंदसिंह

गुरु तेघला जेव्हां दिल्लीस नेण्यांत आलें त्या वेळीं आपला अन्तिम काळ जवळ आलेला पाहून त्यानें आपल्या दहा वर्षांच्या मुलाला गुरु नेमून दिलें होतें. जयसिंहाबरोबर ज्या वेळीं तेघबहादुर बंगाल देशांत गेला होता, त्या वेळीं पाटलीपुत्र येथें इ. स. १६६६ त ह्याचा जन्म झाला. ह्याचें बालपण मामाकडेच गेलें होतें. पुढें तेघचें जेव्हां औरंगजेबाबरोबर युद्ध झालें तेव्हां बापानें त्याला अमृतसरला बोलावून घेतलें होतें. त्याला पितृसुख फारसें लाभलें नाहीं पण माता गुजरी मात्र मुलाचा पराक्रम पाहाण्यास बरींच वर्षें जिवंत होती.

मागील प्रकरणांत गुरु तेघचें शव एका हलक्या जातीच्या मनुष्यानें औरंगजेबाच्या हातांवर तुरी देऊन मोठ्या धैर्यानें आणून गुरु गोविंदसिंहाच्या स्वाधीन केलें ही हकीकत आलीच आहे. त्या गोष्टीचा सविस्तर इतिहास असा आहे :

गुरु तेघला बंदी करून नेल्याची बातमी गोविंदसिंहाला कळली तेव्हां तो अतिशय संतापला. त्यानें कांहीं शिष्यांना दिल्लीस पाठविलें व तोही त्यांच्या मागोमाग गेला. औरंगजेब गुरूचें प्रेत परत करण्यास नाकारतो ही बातमी शिष्यांनीं त्याला सांगितली, तेव्हां त्यानें त्यांची अत्यंत निर्भर्त्सना

केली. गुरूचें प्रेत आणण्यास जर आपण असमर्थ असूं तर आपण गुरूचे शिष्य व मी त्याचा पुत्र म्हणून घेण्यास नालायक आहोंत म्हणून त्यानें स्वतःचा व शिष्यांचा धिक्कार केला. शिष्यांतून एकही जर हें काम करण्यास पुढें येत नसेल तर आपण स्वतः प्राण देऊनही पित्याचें प्रेत बाहेर आणून त्यास अग्निसंस्कार दिल्याशिवाय गुरुपदाला योग्य होणार नाहीं अशी त्यानें प्रतिज्ञा केली.

गुरु गोविंदची ही प्रतिज्ञा पाहून एक वृद्ध शीख आपल्या मुलासह गुरूचें प्रेत आणण्यास पुढें आला. "ह्या कार्यांत तुमचे प्राण पणाला लागले तर तुमच्या मागोमाग मीही प्राणार्पण करण्यास येतोंच." असा गुरु गोविंदसिंहानें त्या पितापुत्रांना निरोप दिला. गुरुचरणांना वंदन करून ते पितापुत्र दिल्लीकडे निघाले. रस्त्यांत तिसरा एक शीख त्यांना भेटला. मध्यरात्रीं सर्वांनीं प्रेत आणण्यास जाण्याचें ठरविलें.

ठरल्याप्रमाणें तिघेही मध्यरात्रीं कारागाराजवळ आले. पहारेकरी झोपलेले पाहून त्या तरुण युवकानें तटावरून आंत प्रवेश केला. त्याच्या मागोमाग वृद्ध पिताही आंत शिरला. तिसरा शीख मात्र बाहेरच होता. आंत गुरु तेघचें प्रेत पाहून शोकमग्न स्थितींतही त्यांना कार्य सफल होत असलेलें पाहून जरा आनंदच वाटला. परंतु कार्य अद्याप पूर्ण व्हावयाचें होतें. प्रेत नेऊन आपण सुरक्षित गुरु गोविंदासिंहाकडे जाईपर्यंत दिवस उजाडेल व हे पहारेकरी येथें गुरूचें प्रेत नाहीं असें पाहून आपला पाठलाग करतील ह्या भीतीनें तेथें दुसरें एक प्रेत ठेवून द्यावें असा त्यांनीं विचार केला. पितापुत्रांत अहमहमिका लागली. अखेरीस पित्यानें गुरूच्या प्रेतापुढें मान कापून आपला प्राण अर्पण केला व मुलाच्या मार्गांतील भय नाहींसें केलें. आपल्या ह्या मर्त्य देहाचें गुरुचरणीं सार्थक होणार हें जाणून "आपल्या पित्याचा सूड घेण्यास गुरूला सांग व त्या कामीं तूंही प्राणाची पर्वा न करितां गुरूस मदत कर." असा अखेरचा निरोप पित्यानें पुत्रास दिला. ह्या अखेरच्या शब्दाबरोबर वृद्ध पिता गुरुचरणीं लीन झाला.

ह्या पितापुत्रांना बाहेर येण्यास उशीर लागलेला पाहून बाहेर उभा असलेला शीख आंत गेला. तेथें दोन प्रेतें पाहून त्यानें त्या युवकाला प्रश्न केला, “ हीं दोन प्रेतं कुणाचीं ?” युवकाचे डोळे भरून आले. त्यानें सर्व वृत्तान्त त्यास सांगितला. त्यांनीं बाहेर येण्याची त्वरा केली. पुन्हा एकदा तो युवक पित्याच्या शवाकडे पाहून म्हणाला, “ बाबा, आपण धन्य आहांत. आपण आपल्या जन्माचं सार्थक केलंत. आपल्यासारख्या पुण्यवान् पित्याच्या पोटीं मला जन्म लाभला ह्याबद्दल मी स्वतःला धन्य मानतों. पुन्हा परमेश्वर मला आपल्या पोटींच जन्म देवो ही माझी प्रार्थना आहे. आपल्या शवाला मी संस्कार देऊं शकत नाहीं ह्याबद्दल मला फार वाईट वाटतं; पण गुरुसेवेंत अर्पिलेल्या देहाला संस्काराची आवश्यकताच कोणती ? माझंही शरीर गुरुसेवेंत पडो एवढाच मला आशीर्वाद द्या.” अशी प्रार्थना करून त्यानें पित्याच्या शवाला वंदन केलें आणि अश्रु पुसत तो बाहेर आला.

संध्याकाळच्या अगोदर गुरूचें शव गुरु गोविंदसिंहापुढें ठेवण्यांत आलें. गुरूला तो वृद्ध शिष्य दिसला नाहीं म्हणून त्यानें त्याची चौकशी केली. शीखानें सर्व वृत्तान्त गुरूस निवेदन केला, तेव्हां गुरूचें हृदय भरून आलें व त्याच्या डोळ्यांतून अश्रुपूर वाहूं लागला. सूर्यास्तापूर्वींच चिता रचण्यांत येऊन गुरु तेघच्या शवास अग्नि देण्यांत आला. त्या चिताग्नीला साक्षी ठेवून गुरु गोविंदसिंहानें पित्याच्या वधाचा सूड घेण्याची प्रतिज्ञा घेतली. त्याच्या मागून इतर सर्व शिष्यांनींही प्रतिज्ञाग्रहण केलें.

ह्याच सुमारास मोगली सत्तेकडून हिंदूंचा अत्यंत छळ होऊं लागला. धर्मान्तराची हिंदूंवर जबरी होऊं लागली. न्यायालयांत पक्षपात होऊं लागला. सक्तीनें हिंदूंच्या संपत्तीचें अपहरण होऊं लागलें व त्यांना क्रूरपणाच्या शिक्षा होऊं लागल्या. हिंदु ह्या अवहेलनेला अतिशय कंटाळले. संकटग्रस्त गरीब हिंदूला आश्रय दिल्याबद्दल तारुसिंह नामक एका शीखाला ठार मारण्यांत आलें. आपल्या पूज्य देवतेची पूजा करणें हाच

जणुं भयंकर गुन्हा ठरवून हकिकतराय नांवाच्या एका बालकाला कारागारांत टाकून त्यास धर्मान्तर करण्यास सक्ति केली. त्यानें छत्रपति संभाजीप्रमाणेंच उत्तर देऊन स्वधर्माकरितां प्राणार्पण करण्याची तयारी दाखविली. त्याप्रमाणें पुढें त्या बालकाचा शिरच्छेद करण्यांत आला. स्वधर्मीयांची ही अवहेलना पाहून गुरु गोविंदसिंह प्रतिकाराची तयारी करूं लागला.

आपली प्रतिज्ञा पूर्ण करण्याचा गुरु विचार करूं लागला. सामर्थ्य-संपादनासाठीं हिमालयांत जाऊन तपश्चर्या करण्याचें त्यानें ठरविलें. कांहीं शिष्यांसह गुरु हिमालयांत गेला. तेथें त्यानें योगाभ्यास करून बौद्धिक सामर्थ्य व शरीरसामर्थ्य संपादन केलें. कित्येक वर्षांनंतर तो परत आला तेव्हां त्याला शीखधर्माची दुर्दशा झालेली आढळली. बादशहाच्या छळामुळें अनेक शीख स्वस्थपणें काळ घालवीत होते. धर्माला ग्लानि आली होती. स्वधर्माकरितां अंतःकरणपूर्वक साहाय्य करणारे किती शिष्य मिळतील हा प्रश्न गुरूपुढें उभा राहिला. शिष्यांची परीक्षा घेण्याचें त्यानें ठरविलें. मोठमोठीं कामें पार पाडण्यासाठीं भगवंताचें अधिष्ठान लागतें अशीं वचनें त्यानें पुराणान्तरीं वाचलीं होतीं. शक्तीची आराधना करण्यासाठीं गुरु गोविंदानें यज्ञ करण्याचें ठरविलें.

कोटनयना देवीच्या पर्वतावर यज्ञसभारंभाची तयारी झाली. सर्व पंजाब-मधून शिखांचे जथ्थे ह्या धर्मकृत्याच्या दर्शनानें पावन होण्यासाठीं यज्ञाकडे धाव घेऊं लागले. गुरूनें आपल्या तेजस्वी वाणीनें अनुयायांच्या हृदयांतील धर्मज्योत प्रदीप्त केली. यज्ञसमाप्तीच्या दिवशीं देवीनें प्रकट होऊन गुरूस दर्शन दिलें. होमकुंडांत त्याला एक तलवार सापडली. आपले मनोरथ पूर्ण करण्यासाठीं देवीचा हा प्रसाद आहे असें मानून त्यानें ती ग्रहण केली. शक्तिदेवीला नैवेद्य म्हणून कांहीं बलि द्यावयाचे आहेत त्यासाठीं ह्या तलवारी-खालीं मान देण्यास कोण तयार आहे असा प्रश्न गुरूनें शिष्यांपुढें टाकला. स्वधर्माकरितां प्राण देण्यास किती शिष्य तयार होतात हें पाहाण्याची ही

परीक्षाच होती. दयासिंह नांवाचा एक तरुण क्षत्रिय पुढें झाला. गुरूनें त्याला तंबूंत नेलें. क्षणार्धांत रक्ताचा पाट तंबूबाहेर आलेला पाहून लोक जसे भयचकित झाले, तशी त्यांना स्फूर्तिही येऊं लागली. रक्तानें माखलेली तलवार समोर करून देवीकरितां आणखी इसमांची गुरूनें मागणी केली. पुन्हा चार क्षत्रिय क्रमानें तंबूंत नेण्यांत आले. तंबूच्या बाहेर रक्ताचे पाट वाहूं लागले. जनतेंत ह्या हुतात्म्यांचा जयजयकार होऊन एक प्रकारचें बल संचरूं लागलें. थोड्या वेळानें हे पांचही पुरुष नवीन वस्त्रें परिधान करून तंबूच्या बाहेर आलेले पाहून लोक आश्चर्यानें चकितच झाले. प्रत्येक वेळीं गुरूनें तंबूच्या आंत बकऱ्यांचा वध केला होता. ह्या पांच शिष्यांना गुरूनें 'पंचप्यारा' अशी संज्ञा दिली. अशा रीतीनें गुरु गोविंदसिंहानें सामुदायिक हौतात्म्याचें बीजारोपण केलें.

गुरु गोविंदसिंह हिमालयांत गेल्यावर गुरूच्या अभावीं शीखांत शैथिल्य आल्याचें दिसून आलें. ह्याला कारण गुरु हाच आपला नेता आहे व गुरूवांचून आपला कोणीच नाहीं अशी शीखांची होत आलेली समजूत. ही भावना काढून टाकण्यासाठीं गुरु आणि शिष्य, उच्च आणि नीच हा समज नष्ट करून सर्व शीख व्यक्तिशः समान भूमिकेवर आणण्याचा गुरु गोविंदसिंहानें प्रयत्न केला. ह्याकरितां त्यानें शिष्यांची संघटना करून 'खालसा' निर्माण केला. शीखांकरितां एक विशिष्ट संस्कार निर्माण करून शीखधर्माची दीक्षा देण्याचा प्रघात पाडला. ह्या संस्कारानें परस्परांत बंधुभाव निर्माण झाला व प्रत्येक शीख शीखधर्माचा एक घटक बनला.

नूतन संस्कार अमलांत आणण्याकरितां गुरु गोविंदसिंहानें शीखांची एक सभा भरविली. एका भांड्यांत पाणी ओतून त्यांत साखर टाकल्यावर तें मिश्रण—अमृत—दुधारी खड्गानें ढवळलें. गुरूनें स्वतः सर्व शिष्यांना तें अभिमंत्रित मधुर पाणी पिण्यास देऊन 'वाह गुरु की फते', 'वाह खालसाजी की फते' असा जयघोष केला. तें पाणी स्वतः गुरूनेंही



दयासिंह नांवाचा एक तरुण क्षत्रिय पुढें झाला.

***************************************

घेतलें. हा दीक्षाविधि देण्याची प्रथा अजूनही शीखांत आहे. अशा रीतीनें शुद्ध झालेल्या खालसाकरितां खालील तत्त्वें मानण्यांत आलीं :

१. शीखधर्मांत जातिभेद मानला जाऊं नये.
२. कोणीही पांच शीख एकत्र जमले कीं येथें गुरूचें अस्तित्व राहील व ते हा दीक्षाविधि देऊं शकतील.
३. दीक्षा घेतलेल्या शीखानें आपल्या नांवापुढें ‘ सिंह ’ हें नांव धारण करावें व परस्पर बंधुप्रेमानें राहावें.
४. प्रत्येक शीखानें युद्धशास्त्रपारंगत होऊन वीरत्व अंगीं बाणावें.
५. समरांगणांत धारातीर्थीं पडलेला शीख स्वर्गांत जातो.
६. आदिग्रंथाशिवाय कोणाला व कशालाही वंदन करूं नये व सकाळसंध्याकाळ त्याचा विवक्षित भाग वाचावा.
७. अमृतसर नगर तीर्थक्षेत्र समजून तेथें प्रत्येक शीखानें जाऊन स्नान करावें, गुरुद्वारास देणगी द्यावी.
८. एक शीख दुसऱ्या शीखास भेटल्यावर ‘ वाह गुरू का खालसा ’, ‘ वाह गुरू की फते ’ हे शब्द उच्चारून परस्परांस आलिंगन द्यावें.
९. कोणीही शीखानें तंबाखूचा उपयोग करूं नये.
१०. ‘ अकाल, सत् श्री अकाल ’ ही शीखांची युद्धगर्जना असावी.
११. शीखपंथांत येणाऱ्या प्रत्येकानें ‘ पोल ’ हा दीक्षाविधि घेतलाच पाहिजे.
१२. प्रत्येक शीखानें पुढील ५ ‘ क ’ कार अवश्य पाळावे :
    १ केस —शरीरावरील सर्व केस वाढविणें.
    २ कंगा —केस साफ करण्यासाठीं लहान फणी बाळगणें.
    ३ कछ —अगदीं लहान विजार घालणें.
    ४ कडा —हातांत लोखंडाचें कडें घालणें.
    ५ कृपाण—स्वसंरक्षणाकरितां लहान तलवारीसारखें शस्त्र बाळगणें.

अशा रीतीनें एका व्यक्तींत असलेलें गुरुत्व वरील नियमानें प्रत्येक शीखांत उत्पन्न करून त्याला आत्मशक्तीची जाणीव करून देण्यांत आली व त्याबरोबरच शीखसमाज हाच गुरुपदावर अधिष्ठित झाला. हलक्या जातीचे समजले जाणारे लोक गुरूच्या झेंड्याखालीं जमले व त्यांची संख्या वाढत जाऊन ८० हजारांवर गेली. धार्मिक, सामाजिक विचार व वेषभूषा निश्चित होऊन एकजीव झालेल्या ह्या प्रचंड सेनेला गुरूनें युद्धकलेचें शिक्षण देण्यास प्रारंभ केला. त्यांचीं पथकें पाडून सेनापति नेमले. दर्शनासाठीं येणारे अनेक भक्त गुरूस बंदूक, तलवार, गोळ्या, हत्ती, घोडे ह्यांची भेट अर्पण करूं लागले. उत्तरोत्तर गुरूचा लौकिक वाढूं लागला. पंजाबांत शीखांचें स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची त्यांनीं इच्छा धरली.

बादशहाचे मांडलिक असे अनेक पहाडी राजे उत्तरेंत पारतंत्र्यांत खितपत पडले होते. बादशहाच्या त्रासानें अगोदरच ते गांजले होते. गुरूनें ह्या संधीचा फायदा घेऊन त्यांना आपल्या मताचे केले. एका राजानें उत्तम घोडे, शस्त्रें, रत्नें, वगैरे गुरूस अर्पण केलीं. दुसऱ्या राजानें हत्ती, तंबू, डेरे दिले. साम, दाम, दंड, भेद वगैरे उपायांनीं अनेक राजे गुरूनें अंकित करून घेतले. स्वतःच्या रक्षणाकरितां गुरूनें लोहदुर्ग, विजयदुर्ग, पुष्पदुर्ग व आनंददुर्ग असे चार किल्ले बांधले. अशा रीतीनें सुसज्ज बनून मोगल बादशाही नष्ट करण्याचा त्यानें चंग बांधला.

गुरु गोविंदसिंहाच्या पराक्रमाच्या गोष्टी दक्षिणेंत औरंगजेबाच्या कानांवर गेल्या व लगेच संभाजीची बायको व बालछत्रपति शाहू ह्यांना अटक करून तो दिल्लीस परतला. तेथून पहाडी मांडलिक राजांकडून करवसुलीसाठीं चार सेनापति सैन्य देऊन त्यानें पाठविले. परंतु ह्या राजांनीं गुरु गोविंदसिंहाचें मांडलिकत्व स्वीकारलें असल्यानें त्यांनीं खंडणी देण्याचें नाकारलें. मोगल सेना पराभव पावून परत गेली.

ह्या पराभवानें बादशहा अधिकच चिडला. त्यानें लाहोरचा सुभेदार दिलावरखां ह्यास खंडणीवसुलीकरितां पाठविलें व त्याचा पुत्र रुस्तमखां

ह्यास आनंदपूर येथें गुरु गोविंदसिंहावर पाठविलें. परंतु रात्रींच आनंदपूर-नजीकच्या नदीस पूर येऊन रुस्तमखानाचें बरेंच सैन्य वाहून गेलें व शेवटीं तो परत गेला. दिलावरखांच्या फौजेनें मंडी, जम्मू, कुल्हूर, गुलेरी येथील राजांवर हल्ले चढविले परंतु गुरु गोविंदसिंहाच्या साहाय्यानें त्यांनीं मोगल फौजेस पिटाळून लावलें.

मोगल फौजेच्या पराभवाची वार्ता कानीं पडतांच बादशहानें आपला पुत्र सुलतान मुअज्जम ह्यास इ. स. १६८८ मध्यें निवडक फौज देऊन गुरूवर चढाई करण्यास पाठविलें. ह्या वेळीं गुरु आनंदपूरच्या किल्ल्यांत होता. मोगल सैन्य अफाट होतें. त्याच्याशीं मैदानावर लढाई देणें धोक्याचें हें जाणून तो निवडक लोकांसह २।३ दिवस किल्ल्यांतच राहिला. एका अंधेऱ्या रात्रीं गुरूनें मोगल फौजेवर हल्ला चढविला. मोगलांचा पराभव झाला.

ह्यानंतर गुरु, पहाडी राजे व मोगल अधिकारी ह्यांच्या वारंवार आपापसांत चकमकी उडत राहिल्या. गुरूनें सावध राहून आनंदपूर किल्ल्याची दुरुस्ती केली. मोठा मुलगा अजितसिंह ह्याच्या हाताखालीं सैन्य देऊन शेरगड किल्ल्यावर, नानसिंह व शेरसिंह ह्यांना लोहगडवर, आलमसिंग व संगतसिंह ह्यास दमदमा येथें आणि उदयसिंग व ईश्वरसिंग ह्यांस आममपुरा येथें किल्ल्याच्या संरक्षणार्थ पाठवून दिलें.

औरंगजेब आतां जास्तच खवळला व त्यानें लाहोर-काश्मीर येथील सुभेदारांना गुरु गोविंदसिंहास जिवंत पकडून आणण्याचा हुकूम सोडला. मोगल फौज आनंदपूरवर चाल करून आली. आंतून शीखांनीं तोफखाना सुरू केला व बाहेरून मोगलांनीं गोळ्यांचा वर्षाव केला. शेरगड किल्ल्यांतून अजितसिंह शीखसैन्य घेऊन आला. दोघांच्या कचाट्यांत मोगल सैन्य चिरडलें गेलें. आनंदपूरला रक्ताच्या नद्या वाहिल्या व शीखांनीं युद्ध जिंकलें.

************************************************

औरंगजेबास हें वृत्त ऐकवलें नाहीं. शेवटचा निकराचा प्रयत्न म्हणून पंजाबांतील सुभेदारांना पुन्हा आनंदपूरवर हल्ला चढविण्याचा हुकूम झाला. मोगल सैन्य वादळाप्रमाणें आनंदपूरवर आलें. मोगलांचा प्रचंड वेढा आनंदपूरवर पडला. तोफांची सरबत्ती सुरू झाली. कित्येक आठवडे वेढा उठण्याचें चिन्ह दिसेना. किल्ल्याची रसद मोगलांनीं बंद केली. शीख फौजेनें चणे खाऊन दिवस काढले. अखेरीस उपाशी मरण्याची वेळ आली. उपासमारीच्या त्रासानें गुरु लवकर शरण येईल म्हणून त्यास ‘ निःशस्त्र होऊन बाहेर येत असल्यास जीवदान देऊं ’ असा मोगलांनीं निरोप पाठविला. कित्येक शीख मरण पावले. निकराचा प्रसंग पाहून आपले चार मुलगे, बायको, माता गुजरी व पन्नास शीख ह्यांसह गुरु अंधाऱ्या रात्रीं आनंदगडच्या किल्ल्यांतून मोठ्या शिताफीनें बाहेर पडला. माता, दोन स्त्रिया व दोन धाकटे मुलगे ह्यांना दिल्लीजवळ एका खेड्यांत एका ब्राह्मणाजवळ ठेवून दोन वडील मुलगे व शिष्य घेऊन गुरु चमकोर किल्ल्यांत येऊन राहिला.

चमकोर किल्लाही मोगलांनीं घेरला. पुन्हा युद्ध व तोफखाना सुरू झाला. किल्ल्यांत तोफा नव्हत्या. अजितसिंह हा १८ वर्षांचा गुरुपुत्र मोगल सैन्याशीं लढण्यास बाहेर पडला. त्यानें मोगल सेनापतीस घायाळ केलें, तोंच त्याच्या मस्तकांत दोन गोळ्या घुसल्या व तो धाडकन् जमिनीवर पडला. ‘ वाह गुरु, वाह गुरु ’ करीत त्यानें प्राण सोडला. मुलाचें हें धाडस पाहून मोगलही चकितच झाले. गुरूस ही वार्ता कळली पण पुत्रशोकानें दुःखी न होतां, आपला पुत्र स्वधर्माच्या कारणीं लागला म्हणून त्यास आनंदच वाटला.

भावाचा पराक्रम पाहून अजितसिंहाचा भाऊ झुंझारसिंह ह्यास स्फुरण चढलें. बापापाशीं त्यानें बाहेर लढण्यास जाण्यासाठीं हट्ट धरला. नाइलाजानें बापानें परवानगी दिली. त्या मुलाचे तलवारीचे हात पाहून त्यास वेड लागलें आहे अशी मोंगल अधिकाऱ्यांची समजूत झाली. एका मोगल

**************************************
अधिकाऱ्यानें त्याचा डावा हात छाटून टाकला. तरी देखील त्या बालकानें उजव्या हातानें दोन मोगल शिपाई घायाळ केले. ह्या मुलाचा पराक्रम व उत्साह पाहून ह्यास जिवंत ठेवणें ठीक नाहीं असें समजून त्याच्या खांद्यावर व मस्तकावर तरवारीचे अनेक निर्दय प्रहार करण्यांत आले. ह्या असह्य वेदनांनीं तो तेजस्वी बालक तत्काळ जमिनीवर पडून मरण पावला.

दोन दिवस शीख व मोगल फौजेचें घनघोर युद्ध झालें. फौजेसह आपणही अखेरेची झुंझ द्यावी असा विचार गुरूनें शिष्यांना सांगितला. शिष्यांना गुरूनें युद्धांत मरावें हा विचार पसंत पडला नाहीं. शीख समाजास अशा प्रसंगीं स्फूर्ति देणारा गुरु गोविंदसिंहासारखा अद्वितीय पुढारी पाहिजेच होता. शिष्य मेले तर अनेक मिळतील, पण गुरूची जागा भरणें शक्य नव्हतें. गुरूलाही हा विचार पटला. गुरु मुसलमान दरवेशाप्रमाणें पोषाख करून चमकोरहून गुप्तपणें निसटला. मुसलमान त्याला ‘पीर’ समजले.

कित्येक महिने अज्ञातवासांत रानावनांत भटकून गुरूनें काढले. रायकोट येथें पोचल्यावर त्यानें फौज जमविली. जुने शिष्य व त्याच्या बायकाही तेथें त्यास भेटल्या. दोघा मुलांच्या मृत्यूची वार्ता ऐकून त्या मातांना अत्यंत वाईट वाटलें. गुरूची माता गुजरी व धाकटे दोन मुलगे जोरावरसिंग व फत्तेसिंग खेड्यांत ज्या ब्राह्मणाकडे ठेवले होते त्या गंगाराम ब्राह्मणानें गुरूमातेचें जडजवाहिर चोरून घेतलें व त्यांची बातमी मोगल अधिकाऱ्यास कळविली. वजीरखानानें गुरूनें केलेल्या पराभवाचा बदला घेण्यास ही संधि उत्तम आहेसें पाहून त्या तिघांना सरहिंद येथें कैदेंत ठेवलें.

दोघा बालकांना वजीरखानानें दरबारांत बोलाविलें. जातेवेळीं नातवांचें माता गुजरीनें प्रेमानें अखेरचें चुंबन घेतलें व “ कांहीं झालें तरी धर्म सोडूं नका ” असा त्यांस उपदेश केला. ह्या बालकांची सुकुमारता, सौंदर्य व निर्भयपणा पाहून दरबारांतील लोक व वजीरखान चकित झाले. “ काफिरोंके

**********************************************

बच्चे, या तो इस्लाम धर्म पर विश्वास करो या मरने के लिये तय्यार हो जाव" असा वजिरानें त्यांस धाक घातला. "दुसऱ्या धर्माचा स्वीकार करण्यापेक्षां मृत्यूस कवटाळणें श्रेयस्कर असा आमच्या गुरूचा आम्हांस निर्वाणीचा संदेश आहे" असा दोघा बालकांनीं निर्भयपणें जबाब दिला. हें उत्तर ऐकून वजीर चिडला. "मुलांना भिंतींत चिणून ठार करा" असा त्यानें हुकूम सोडला. मुलांना मध्यें उभे करून भिंत बांधण्यांत आली. छातीपर्यंत भिंत आली तरी त्या मुलांनीं आपली मुद्रा आनंदी ठेवून 'सत् श्री अकाल', 'वाह गुरु का खालसा' असा जयघोष चालविला होता. मानेपर्यंत भिंत बांधली गेली तेव्हां पुन्हा वजिरानें मुलांची समजूत घातली. त्या वेळीं चवताळून जोरावरनें जबाब दिला "आम्ही गुरु गोविंदसिंहाचे पुत्र आहोंत. आम्ही मरणाला भीत नाहीं. आमच्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूतून जोरावरसिंग व फत्तेसिंग ठिकठिकाणीं पैदा होतील व तुझ्यासारख्या जुल्मी अधिकाऱ्याचा प्राण घेतील." त्या बालकांची वीरता, निर्भयपणा, धर्मप्रेम व देशभक्ति पाहून कोणाचें अंतःकरण भरून येणार नाहीं! हा बालकांचा छळ पाहाण्याकरितां माता गुजरीला तेथें आणण्यांत आलें होतें. आजीचें अखेरचें दर्शन घेऊन त्या वीरश्रेष्ठ बालकांचा कंठ दाटून आला. फक्त मानेनें आजीला वंदन करून एक बालक म्हणाला, "आजी, तूं त्या धैर्यवान् गुरुगोविंदसिंहाची माता आहेस. पितृवधाच्या सूडाची प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठीं प्राणत्यागापेक्षांही भयंकर दुःखें भोगणाऱ्या गुरु गोविंदसिंहाला तूं जन्म दिला आहेस. तुझ्या पतीचा ज्यांनीं वध केला त्यांच्याच तलवारीला स्वधर्माकरितां आज आम्ही बळी पडत आहोंत. ज्या वेळीं शिरच्छेदाची शिक्षा कानीं पडली त्या वेळीं महात्मा तेघनें थोडें देखील दुःख स्वतःस वाटूं दिलें नाहीं. मग तूं त्या महात्म्याची धर्मपत्नी आज आमच्यावर आलेल्या ह्या प्रसंगानें शोकाकुल कां होतेस? महात्मा गुरु तेघबहादुराच्या आत्म्याला स्वर्गांत आज त्याचे नातू त्याच्या आज्ञेनुसार धर्मवेदीवर बलिदान होत असलेले पाहून परम संतोष होत असेल." अखेरीस त्या बालकांची

कत्तल करण्यांत आली. माता गुजरी नातवांची ही दु:खावस्था पाहून जमिनीवर पडली व गतप्राण झाली.

गुरु गोविंदसिंहाच्या दोघा मुलांच्या बलिदानाची बातमी पंजाबांत सर्वत्र पसरली. सर्व शीख आक्रोश करूं लागले. पंजाबांत अजूनही ह्या प्रसंगावर गुरुमुखी भाषेंत रचलेलीं गाणीं स्त्रीपुरुष गात असतात.

चमकोर किल्ल्यांतून निघून गेल्या दिवसापासून गुरु गोविंदसिंह रानोमाळ भटकत होता. वृद्ध माता, सुकुमार पुत्र, प्राणप्रिय शिष्य स्वधर्मार्थ बलिदान झाले आणि आपण वनांतच भटकत आहों ही जाणीव होऊन त्याचें चित्त प्रक्षुब्ध होई. त्यानें पुन्हा शिष्य जमविण्यास सुरुवात केली. रायकोटहून तो दिनानगर ह्या गांवीं गेला. आनंदगडमधून निघून गेलेले शिष्य त्यास भेटले. त्याच्याजवळ शस्त्रें होतीं. येथेंच गुरूनें एक 'दसवे पादशाही का ग्रंथ' नांवाचें एक धार्मिक पुस्तक लिहिलें. नंतर फिरोजपूर येथें येऊन पुन्हा सैन्य जमवून उत्तरेंतील कांहीं यवन अधिकारी पराजित केले. परंतु त्यांत त्याचेही कांहीं लोक मारले गेले; त्यामुळें अगोदरच कमी असलेलें सैन्य अधिक कमी झालें. ह्या सैन्यासह मुक्तसार येथें असतांना त्याला आपल्या मुलांना बादशहानें सरहिंद येथें भिंतींत चिणून मारल्याची दु:खद वार्ता कळली. त्यास दु:ख वाटलें खरें पण आपले कोमल बालक बाल्यावस्थेंतच धर्माकार्यार्थ कामीं आले ह्याबद्दल तितकाच साभिमान आनंदही वाटला. गुरूनें प्रतिज्ञापूर्तीकरितां सैन्याची जमवाजमव चालविली होतीच. इतक्यांत त्याला औरंगजेब दक्षिणेंत मेल्याची बातमी कळली.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुअज्जम व बहादुरशहा ह्या दोघा भावांत गादीकरितां भांडणें सुरू झालीं. बहादुरशहानें गुरूजवळ मदतीची याचना केली. दोन हजार शीख सैन्यानिशीं गुरूनें बहादुरशहास जय मिळवून दिला. मुअज्जम लढाईत ठार झाला. बहादूरशहा गुरूचा मित्र बनला. त्यानें गुरूस मोठ्या थाटानें आपल्या बरोबर ठेवलें. बादशहानें गुरूस दक्षिणेंत येण्याची आग्रहाची विनंती केली. दक्षिणेंत

*******************************************

मराठ्यांनीं स्थापन केलेली हिंदुपदपादशाही प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहावी, अशी गुरूचीही कधींची इच्छा होती. गुरु गोविंदसिंह दक्षिणेंत येण्यास निघाला. ब्र्हाणपूरपासून तो आपल्या शिष्यांसह स्वतंत्रपणें तीर्थक्षेत्रें करीत शेवटीं गोदावरीच्या कांठीं नांदेड येथें विश्रांतीसाठीं येऊन राहिला. थोड्याच दिवसांनीं एके रात्रीं तो झोपेंत असतां चार पठाणांनीं त्यास पकडून जखमी केलें व ते पळून गेले. शिष्यांनीं त्यांस पकडून त्यांचा क्रूरपणानें वध केला. जखमांच्या असह्य वेदनांनीं गुरु गोविंदसिंह अत्यंत क्षीण झाला व लवकरच वयाच्या ४२ व्या वर्षीं इ. स. १७०८ मध्यें स्वर्गवासी झाला.

मृत्युसमयीं गुरूनें आपल्या शिष्यांना एकत्र बोलावून खालीलप्रमाणें संदेश दिला : " दहा गुरु व्हावे असा ईश्वरी संकेत होता. मी शेवटचा गुरु असल्यानें ह्यापुढें तुम्ही कोणासही गुरु मानूं नका. पांच शीख जेथें जमतील तेथें मी आहेंच असं समजा. एकीनें राहून माझी इच्छा पूर्ण करा. मी आतां उत्तरेंत येऊं शकत नाहीं, तरी हा माधवदास शिष्य माझ्या पश्चात् तुम्हांला मार्गदर्शक होईल. "

शीखांनीं नांदेड येथें एक समाधिमंदिर बांधलें असून तेथें प्रतिवर्षीं दूरवरचे शीख ह्या गुरुगोविंदसिंहाच्या समाधीचें दर्शन घेण्यास येत असतात.

गुरु गोविंदसिंहाची कामगिरी शीखधर्माला शीख हें अभिधान' योग्य रीतीनें आणून देण्यास कारणीभूत झाली. शीख धर्माचें बीज प्रत्येक शीखांत पक्कें रुजवून शीख धर्माचा वृक्ष आज जो मोहोरलेला दिसतो तो गुरु गोविंदसिंहाच्या कामगिरीमुळेंच होय. शिवाजीप्रमाणें पंजाबांत शीखांचें राज्य स्थापन करावें अशी गुरु गोविंदसिंहाची इच्छा होती. परंतु शिवाजी-पेक्षां गुरूची परिस्थिति अत्यंत विचित्र होती. गुरूचा बहुतेक काल परिस्थितीशीं झगडण्यांत गेला. गुरूला शीखधर्माचा उत्कर्ष साधून शीखराजकारण पाहावें लागे. त्याच्यापुढें आधीं धर्म, नंतर राजकारण होतें.

गुरु गोविंदसिंह हा कुशल सेनानी व मुत्सद्दी होता. त्याच्या अंगीं संघटना करण्याचें कौशल्य, धर्माबद्दल आत्यंतिक प्रेम, महत्त्वाकांक्षा, चिकाटी, इत्यादि गुण होते. हा जसा तलवारबहादुर होता तसाच उत्तम लेखकही होता. लहानपणींच त्यानें 'विचित्रनाटक' नांवाचा गुरुमुखी भाषेंत आपल्या पूर्वजन्माच्या वृत्तान्तपर एक ग्रंथ लिहिला व शेवटीं 'दसवे पादशहा का ग्रंथ' लिहून काढला.

[ १ ] गुरु गोविंदसिंहानें बापाच्या वधाचा सूड घेण्याची प्रतिज्ञा कशी पूर्ण केली ? [ २ ] गुरु गोविंदसिंहानें नवीन संस्काराची प्रथा कां पाडली ? तो संस्कार कोणता ? [ ३ ] गुरु गोविंदसिंहाच्या चारही बालकांच्या पराक्रमाच्या व बलिदानाच्या कथा सांगा. [ ४ ] गुरु गोविंदसिंहाचे अखेरचे दिवस कसे गेले ? त्याचा शेवट कसा झाला ? त्यानें आपल्या पश्चात् कोणती व्यवस्था करून ठेविली ? [ ५ ] गुरु गोविंदसिंहानें शीख समाजांत कोणता फरक घडवून आणला ?

REFBK-0007953

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७९५३
शाखा